दे पुढारी दि 23 डिसेंबर १९९८



# भूतलावरील अद्‌भुत आविष्कार : ॐकार स्वरूप सामानगड

(प्रल्हाद माने, नेसरी यांजकडून) : ऐतिहासिक वारसा आणि प्राचीन संस्कृतीच्या पाऊलखुणा जपणाऱ्या गडहिंग्लज तालुक्यातील सामानगड परिसरास तेथील सृष्टीनिर्मित ॐ आकारातील डोंगरामुळे आगळे-वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. सृष्टीसौंदर्याने नटलेल्या अशा या सामानगड परिसराचे पुराणवस्तू संशोधन खात्याने संशोधन करावे



सामानगडावरील जांभ्या दगडात कोरलेले भुयारी शिवलिंग मंदिर

तसेच हे 'पर्यटन स्थळ' म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने या जागेची पाहणी करावी, अशी सामानगड परिसर व सार्वजनिक बांधकाम उपअभियंता, शाखा अभियंता, विकास समितीचे सचिव के. टी. शेलार यांची मागणी आहे.

### सृष्टीनिर्मित ॐ आकारातील डोंगर

८ ते १० चौ. किलोमीटर क्षेत्रफळ असलेल्या सामानगड परिसरातील मूळचा डोंगर हा निसर्गनिर्मित ॐकार स्वरूपात आहे. उखळीसारख्या कठीण खडकातील खुणांचा मागोवा घेऊन निरीक्षण केल्यास व ३/४ तास या गडावर भटकंती करून सिंहावलोकन केल्यास हा विशिष्ट आकारातील डोंगर नजरेपुढे येतो.

ठिकठिकाणच्या प्राचीन खुणांवर पर्यटकांनी उभे राहून समोर क्षितिजाकडे नजर फेकल्यास सुमारे ५० किलोमीटर परिसरातील सौंदर्य स्थळे पहावयास मिळतात.

गडहिंग्लज उपविभागाचे प्रांताधिकारी संजय चव्हाण यांनी परिसरात स्वतः भटकंती करून या डोंगराचा आकार ॐकार स्वरूप असल्याचे अनुभवले आहे.

या गडावरील वेगवेगळ्या पॉईंटवरून कर्नाटकातील हिडकल तलावाचा विशाल जलाशय, हरगापूरचा वल्लभगड व तेथील पवनचक्क्या, हिडकलजवळील मच्छिंद्रगड, भुदरगड परिसरातील रांगणा किल्ला, चंदगड जवळील महिपालगड तसेच गंधर्वगड असे ७ किल्ले तसेच आंबोली परिसराचे दृश्य पाहता येते.

### अप्रतिम सूर्यास्त दर्शन


सामानगडावर रामखडी नावाने ओळखला जाणारा पॉईंट आहे. या पॉईंटच्या पूर्व बाजूस डोंगराची दरड असून त्यात प्राचीन सुंदर कमानी जांभ्या दगडात कोरल्या असून त्यामध्ये शिवलिंगाची स्थापना करण्यात आली आहे. चिकित्सक वृत्तीने तसेच सातत्याने निरीक्षण केल्यास दोन डोंगरांच्या दोन टोकादरम्यान सूर्याचे दक्षिणायन व उत्तरायण पाहता येते.

### प्राचीन भुयारी शिवलिंग मंदिर

अतिप्राचीन जांभा दगडात कोरलेल्या भुयारात सुंदर असे शिवलिंग मंदिर लपलेले आहे. यामध्ये शिवलिंगाचा गाभारा आहे. शिवकालीन जागृत मारुती मंदिर बलभीम स्वरूपात ते सुमारे ३२५ वर्षापूर्वीचे असल्याचा अंदाज आहे. येथे महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते.

या ठिकाणी जांभ्या दगडात बैठक खोली, स्वयंपाक घर, धान्य कोठार, स्नानगृह, अंगण इत्यादी प्राचीन संस्कृतीचे अवशेष आजही पाहावयास मिळतात.

शिवकाळात शस्त्रसाठा रसद, दारूगोळा इत्यादी पुरवठा इतर किल्ल्यांना येथून होत असे म्हणून या गडास 'सामानगड' म्हणतात. किल्ल्याच्या बाजूला मोगल टेकडी, भीमशाप्पा समाधी मंदिर, पांडव मंदिर, चाळोबा मंदिर, गोमुख ही प्रेक्षणीय स्थळे आहेत. तरीसुद्धा ऐतिहासिक महत्त्वाचे तसेच प्राचीन संस्कृतीवर प्रकाशझोत टाकणारे अवशेष आजही दुर्लक्षित आहेत.




भूतलावरील अद्‌भुत आविष्कार गडहिंग्लज तालुक्यातील सामानगडावरील अतिप्राचीन संस्कृतीच्या विशिष्ट खुणांसह (डिमार्केशन)

पुराण वस्तू खात्याने या विशिष्ट खुणा तसेच जांभ्या दगडातील कोरीव काम यांची पाहणी करून प्राचीन संस्कृतीचा शोध घ्यावा आणि प्राचीन संस्कृतीचा कालावधीही शोधावा.

Scanned by CamScanner

दै. पुढारी, दि. १९ एप्रिल २०००, पान सात

# किल्ले सामानगड पर्यटनस्थळ म्हणून घोषित

## सुशोभिकरणाची मागणी

गडहिंग्लज, दि. १८ (प्रा. सुनील देसाई यांजकडून) : गेली कित्येक वर्षे उपेक्षित राहिलेल्या किल्ले सामानगडाचा अखेर महाराष्ट्र शासनाने पर्यटनस्थळ यादीत समावेश केला असून प्रथमतः किल्ल्यावरील अस्तित्वात असलेल्या विहिरीतील गाळ काढणे तसेच पुरातत्व विभागाने भग्न अवशेषांचे संशोधन करावे यासह किल्ल्यावरील पाणीसाठा पंचक्रोशीतील जनतेला उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय यंत्रणेने पावले उचलावीत, अशी मागणी यानिमित्ताने होत आहे.

१८५७चे स्वातंत्र्यसमर होण्यापूर्वी महाराष्ट्रात गडहिंग्लज पेठ्यातील किल्ले सामानगडाच्या गडकऱ्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध केलेले सशस्त्र बंड सामानगडावर घडले, अशी ख्याती असलेल्या व शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सामानगडाची अलीकडच्या काळात दुरवस्था झाली आहे. विविध कारणांनी सामानगड ठळक चर्चेत आहे. आजुबाजूचा परिसर सहजपणे नजरेस पडणाऱ्या या किल्ल्यास नैसर्गिक उंची व जागा लाभली आहे. समुद्रसपाटीपासून २६०० फूट उंचावर आणि २६० फूट रुंदीच्या गडहिंग्लजच्या दक्षिणेला सहा कि. मी. अंतरावरील दीर्घ वर्तुळाकार माथा असलेला सामानगड किल्ला आज सभोवार आठ फूट उंचीचा असणारा भव्य तट भग्नावस्थेत असल्याने तसेच वन खात्याच्या जमिनीत काही मंडळींनी शिरकाव केल्याने आणि गडावरील झाडे तोडल्याने विशेष चर्चेत आहे. तटाच्या आत खंदकात खोदलेल्या कित्येत विहिरीत विपुल पाणी असून आजदेखील या किल्ल्यावरील विहिरींपैकी सात कमानी असणाऱ्या हनुमंत विहिरीत प्रचंड पाणी आहे. विहिरींचा गाळ काढल्यास पंचक्रोशीतील गावांना उन्हाळ्यात सहज पाणीपुरवठा होऊ शकेल, अशी अवस्था आहे. मात्र शासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष आणि लोकप्रतिनिधींची अनास्था यामुळे गाळ काढण्याचे काम गेली अनेक दशके रखडले आहे.

गडहिंग्लज पेठ्याचे तत्कालीन मामलेदार रावसो बी. एच. पाटील यांनी ऐतिहासिक परंपरा असणाऱ्या या सामानगडाचा जीर्णोद्धार केल्याची नोंद आढळते. हनुमंत विहिरीचे पाणी १९३० च्या दरम्यान पवनचक्कीच्या सहाय्याने गडावरील मुख्य देवालयाजवळ आणून सोडले होते. पूर्वीपासून या किल्ल्यावर वर्दळ आहे. कै. दिनकरराव शिंदे (मास्तर-नूलकर गडकरी) यांनी गडावरील भग्न देवळाची दुरुस्ती केली असल्याची नोंद आहे. आज शासनाचा फक्त २६ जानेवारी व १५ ऑगस्ट या राष्ट्रीय सणाच्या वेळी ध्वजवंदनापुरताच गडाशी संबंध येतो. परंतु काळाच्या ओघात गडकऱ्यांची उद्ध्वस्त घरे, ढासळते पडके बुरूज, गडावर जाणाऱ्या पाय वाटा आणि उपशाअभावी हनुमंत विहिरीचे पाणी खराब झाल्याचे चित्र दिसून येते.

किल्ले सामानगडावर शासनाने सध्या पक्की सडक बांधली असून हनुमान मंदिर व सत्पुरुष भीमशाप्पा यांच्या समाधीच्या दर्शनासाठी आणि किल्यावर नुकतेच एका कर्नाटकातील स्वामींचे आगमन झाल्यामुळे त्यांच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी झाल्याचे दिसून येते. त्यातच महाराष्ट्र शासनाने किल्ले सामानगडाचा समावेश पर्यटन यादीत केल्यामुळे सामानगडाची उपेक्षा संपेल, असे वाटते. मात्र गडावरील वास्तूंची जपणूक होण्यासाठी पुरातत्व खात्याने सामनगडाचा दडलेला इतिहास शोधण्याचे काम केले पाहिजे. ऐतिहासिक किल्ले, गड ही मराठी साम्राज्याची अस्मिता असून ती जोपासण्यासाठी शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. यापूर्वी दैनिक पुढारीने १५ मे १९८८ व २८ मार्च ९६ रोजी विशेष लेख लिहून यावर प्रकाशझोत टाकला होता.

छत्रपती शिवाजीराजे व रामदास स्वामी यांच्या पाऊलखुणा लाभलेला आणि भोजराजाने बांधलेल्या या गडाचा जीर्णोद्धार व्हावा, पर्यटनस्थळ व्हावे, यासाठी तत्कालीन आमदार ॲड. श्रीपतराव शिंदे, आमदार बाबासाहेब कुपेकर, चार्टर्ड अकौंटंट ए. डी. शिंदे यांच्यासह किल्ले सामानगड पंचक्रोशीतील गडकऱ्यांनी प्रयत्न केले आहेत. त्यामुळे आता शासनाने तातडीने पुरातत्व खात्याच्या सहाय्याने उत्खनन करावे व गडावर असणाऱ्या विहिरींचा गाळ काढावा. या गडावर विपुल पाणीसाठा असल्याची नोंद आहे. शासकीय यंत्रणेने येथील विहिरींची पहाणी करून त्यांची दुरुस्ती करून त्या पाण्याचा वापर पंचक्रोशीतील ग्रामस्थांना करून देणे गरजेचे बनले आहे. तशा सूचना विद्यमान राज्यमंत्री बाबासाहेब कुपेकर यांनी पाणीटंचाई बैठकीत दिल्या आहेत. परंतु त्याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे.

सामागडावरील हनुमंत विहीर, साखरभाव या विहिरी फार महत्त्वाच्या असल्याची चर्चा आहे. साखरभावीचा वापर इतिहासात अंधार कोठडी म्हणून केला जात असे, तसेच अत्यंत अडचणीच्या काळात पाणी पुरावे, पाणी नासवंत होऊ नये म्हणून मोठ्या विहिरीच्या पोटात आणखी एक विहीर असे. दुर्मिळ विहीर गडावर आहे. त्यामुळे गडावरील भुयारवजा विहिरींचे संशोधन करून डागडुजी करणे गरजेचे आहे. पाण्यासाठी फिरणाऱ्या या परिसरातील लोकांना ऐन उन्हाळ्यात पाणी मिळाल्यास सामानगडचे पाणी हा एक दिलासा ठरणारा आहे. त्यामुळे शासकीय यंत्रणेने तातडीने अशा विहिरींची दुरुस्ती करण्याबाबत पावले उचलावीत, लोकप्रतिनिधींनी त्याचा पाठपुरावा करावा, अशी मागणी होत असून शासनाने किल्ले सामानगडाचा समावेश पर्यटन यादीत केल्यामुळे भविष्यात या ठिकाणी पाण्याची गरज वाढणार आहे. तेव्हा पुरातत्व खात्याच्या मदतीने ढासळलेल्या विहिरींचे संशोधन करून त्यांची दुरुस्ती करण्यात यावी व किल्ल्यावरील पठाराचा ज्या पद्धतीने वनविकास महामंडळाने वृक्षांची लागवड करून दिलासा साधला आहे, त्या पद्धतीने किल्ल्याचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने, वनखाते महसूल खाते, यासह पुरातत्व खात्याने संयुक्त मोहीम राबवून किल्ल्याचा टप्पाटप्प्याने विकास साधल्यास नजिकच्या काळात किल्ले सामानगड नावारूपास येईल. याबद्दल कोणाच्याही मनात संदेह नाही. परंतु शासकीय यंत्रणेने पावले उचलणे गरजेचे आहे.

## सातवे येथे ग्रामीण विकास युवक नेतृत्व व सांस्कृतिक कार्यक्रम

कोल्हापूर, दि. १८ : सातवे ता. पन्हाळा येथे नुकताच संस्कार अकादमी कोल्हापूर या संस्थेच्या वतीने आळोबानाथ सांस्कृतिक मंडळ सातवे यांच्या सहकार्याने महिला विकास, युवक नेतृत्व शिबिर व सांस्कृतिक कार्यक्रम तीन दिवस सादर करण्यात आले.


महिला विकास शिबिरामध्ये प्रा. विजयाताई पाटील, डॉ. मुरलीधर डोंगरे व प्रा. उषःप्रभा बारसोडे यांचे व युवक नेतृत्व शिबिरामध्ये विक्रम पाटील, आशिष शिंदे, बी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये ग्रामीण भागातील १२५ वर मुला-मुलींनी सहभाग घेतला. यामध्ये वैयक्तीक व सामूहिक गटामध्ये विविध गान, नृत्य, कला या प्रकारामध्ये खालील उत्कृष्ट स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली.

वैयक्तिक गट : विजेते - शितल निकम, वसंत कोळी, शिवाजीराव लोहार, सादिक साखरे, विनायक कांबळे, सौ. स्नेहल चव्हाण. सामूहिक गट : विजेते- विवेकानंद विद्यामंदिर, कन्या विद्यामंदिर, विवेकानंद शिशू विहार, सातवे हायस्कूल सातवे. या स्पर्धेत परीक्षक म्हणून विनय जाधव, भाऊसो पाटील व बी. जी. पाटील यांनी काम पाहिले. सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल डॉ. संतो

Scanned by CamScanner

# सामानगडावर भूतलावरील सृष्टीचा अद्भूत आविष्कार

दै. केसरी (कोल्हापूर सांगली) सोमवार दि २८.१२.९८



सामानगड डोंगरावरील भुयारी शिवमंदिर आणि त्याचा कोरीव भाग.



काळ्या दगडावर कोरलेल्या कधीहि नष्ट न होणाऱ्या खुणा.



दगडात कोरलेली लेणी आणि शिवलिंग.

ॐकार म्हणजे जीवनाचे सार आहे, ॐ हा विश्वातला पहिला उच्चार, पहिला नाद आणि पहिले तेज होय. त्यापासूनच आपल्या संस्कृतीला, ग्रंथाला आणि आचार विचाराला प्रारंभ होतो. ॐ हा मंत्रांचा राजा आहे. ती ज्ञानगंगा आहे. या एकाक्षरी मंत्राचा आजहि मानवी शरीर व त्याचा परिसर यांच्यावर फार मोठा परिणाम होतो, असा दावा करून गडहिंग्लजचे के. टी. शेलार यांनी सामानगडावर या आणि भूतलावरील सृष्टीचा अद्भूत आविष्कार सृष्टीनिर्मित ॐकाराचे दर्शन घ्या, असे आवाहन केले आहे.

सामानगडाच्या पायथ्याशी वसलेल्या वैरागवाडी या गावचे शेलार, याच परिसरात नौकुड येथे त्यांचे वंशज राहायला आले. सामानगड किल्ला व परिसर यांच्याशी वंश परंपरागत भावनिक आणि मानसिक संबंध गुंतल्याने शेलार यांनी सामानगड परिसरात स्वतःला झोकून देऊन संशोधनाच्या माध्यमातून त्यांनी अनेक आव्हाने उभी केली आहेत.

पाटबंधारे खात्यात शाखा अभियंता म्हणून शासकीय सेवेत सध्या शेलार वावरत आहेत. आपल्या प्रदीर्घ अनुभवातून आणि आध्यात्मिक शक्तीच्या जोरावर सामानगड परिसराला ॐकाराचे स्वरूप प्राप्त आहे, हे सिद्ध केले आहे. आपल्याला आलेला अनुभव इतरानाहि द्यावा यादृष्टीने त्यांनी अनेक राजकीय पुढारी, शासकीय अधिकारी, शालेय सहली यांना प्रत्यक्ष सामानगडावर निमंत्रित करून ॐकाराचे दर्शनहि घडवले आहे.

किल्ल्याचा भाग वगळता सुमारे आठ किलोमीटर परिसर म्हणजे सृष्टीचा एक अद्भूत खजिना आहे. ॐ च्या सुरुवातीस अप्रतिम असा सूर्यास्त देखावा अनुभवता येतो. या ठिकाणावरून सुमारे ३० ते ५० किलोमीटर लांबीचे सृष्टीसौंदर्य पाहता येते. या ठिकाणी एकावर एक तीन भव्य दगड ठेवलेले आहेत. यालाच रामखडी म्हणून ओळखले जाते. किल्ल्याच्या परिसरात जिथे-जिथे तुम्हाला सृष्टीसौंदर्य पाहायचे आहे, त्याच्या मार्गदर्शक खुणा पाहावयास मिळतील. दगडावर अतिप्राचीन काळातील उखळी सारख्या या खुणा आहेत. या खुणा म्हणजे कोणत्या दिशेने नेमके काय पहावे, याचे मार्गदर्शन आहे, असा दावा शेलार यांनी केला आहे.



के. टी. शेलार

सूर्यास्ताचा देखावा पाहून झाल्यानंतर आपल्याला काही अंतर चालून आल्यानंतर अप्रतिम ॐ स्वरूप डोंगराचा अनुभव येऊ लागतो. जसे पुढे जाल तसे त्याचे स्वरूप भव्य दिसू लागते. ॐच्या शेपटीचा आकारहि नजरेत भरू लागतो. अर्थात दगडावर आणि आजूबाजूच्या पाषाणावर असलेल्या अतिप्राचिन खुणा जिथे आहेत, तेथूनच हे देखणे सृष्टीसौंदर्य पाहता येते.

सामानगड आणि त्याचा परिसर एक प्रर्यटन स्थळ म्हणून जसे आकर्षक ठिकाण आहे, त्याप्रमाणे हे एक अलौकीक तीर्थक्षेत्रहि आहे. साक्षात प्रभु रामचंद्रा-चा सहवास या मातीला लाभला आहे. प्रभु रामचंद्रांच्या वास्तव्याचे पुरावे इथे उपलब्ध होतील. यासाठी पुरातन विभागाने लक्ष द्यावे, अशी इच्छा शेलार यांनी व्यक्त केली.

इथे प्राचीन सूर्यमंदिरहि आहे. सूर्याची बारामाही किरणे येतात. याच ठिकाणी शिवलिंग स्थापन केले आहे. सूर्योदय आणि पोर्णिमेचा चंद्रोदय पाहण्याचा अद्भूत योग इथे येतो. म्हणजे इथे दोन्ही डोंगरांच्यामध्ये सूर्य दक्षिणायन आणि उत्तरायण कक्षेत उगवतो.

साक्षात प्रभु रामचंद्रांचे निवासस्थान, लक्ष्मीची स्वतंत्र खोली, दत्तमंदीर, बारा ज्योतिर्लिंगाची स्थापना, होमकुंड, समाधीची ठिकाणे यासंदर्भात शेलार यांच्या मदतीने पुरातन खात्याने इथे संशोधन करणे गरजेचे आहे. गोमुखातून पडणारे तीर्थ, यातील पाण्याचे घटक तपासले जावेत, सिद्धता तपासली जावी, यासाठी शेलार यांची धडपड आहे. केवळ हा प्रश्न भावनिक न करता वैज्ञानिक पातळीवर याची चाचपणी झाली पाहिजे. पुरातन खात्याने याबाबत गंभीर नोंद घेतल्यास सामानगड हे एक अलौकीक तीर्थक्षेत्र म्हणून मान्यता पावेल, असा विश्वास शेलार यांनी व्यक्त केला आहे. अनेक राजकीय प्रक्षाच्या नेत्यांनीहि शेलार यांना पाठिंबा दिला असून सुभाष पावले, यशवंत महाराज भोसले, विश्वनाथ गुरव, प्रभाकर शेलार ही मंडळी त्यांना साथ देत आहेत.

दत्ता देशपांडे-शिवाजी मगर

दै. केसरी सोमवार २८-१२-१९९८

# आपला मित्र

संपादक : दयानंद रणदिवे

वर्ष : ६ वे गुरुवार दि. १८ - ३ - १९९९


## ॐकार स्वरुप सामनगड परिसर



प्रभू रामचंद्राचे वास्तव्याचे ठिकाण : त्यामध्ये घरचा देव्हारा, सूर्य मंदिर, न्हानी घर, बैठक खोली, व बाजूला राहण्याचे ठिकाण

गडहिंग्लज तालुक्यातील किल्ले सामानगंड परिसराचा सुमारे ८ ते १० कि. मी. चा मुळ डोंगर अप्रतिम ॐकार स्वरुप असून संपूर्ण वाळू निश्चीत जांभळया दगडाचा आहे. या संपूर्ण डोंगराच्या सभोवती ठिक ठिकाणी मुळ पाषाणात विशिष्ठ संकेत देणाऱ्या उखळी सारख्या खुणा प्राचीन काळी लावलेल्या आहेत. या ॐकार स्वरुप डोंगराच्या शेपटीच्या भागावर विशिष्ठ शेपटासारखी (-) खुण लांवलेली आहे. अशा या प्राचीन काळी लावलेल्या खुणांवर उभे राहिल्यास या डोंगराचे ॐकार स्वरुप स्पष्टपणे पहाता येते. या ॐकाराच्या पोटातून गायमुख म्हणून तिर्थ उगम पावले आहे. त्याच्या गुण उगम स्थानी मुळ पाषाणावर बारीक मोठया नद्या सारख्या विशिष्ठ सांकेतिक खुणा प्राचीन काळी लावलेल्या आहेत. या गायीमुखातून १ इंची इतके पाणी सतत पडत असते. या पाण्याची चव वेगळी असून अतिशय स्वादिष्ट आहे. या गायीमुखातून अधून मधून शंख व शिपले बाहेर येतात. याचा गायीमुखातून अप्रतीम स्वरुपाचा एक पारदर्शक शाळीग्राम (शिवबाण) बाहेर आला आहे.

प्रभु रामचंद्रानी वनवासासाठी दंडकारण्यात प्रवेश केला व दक्षिणेकडे सरकत - सरकत सामानगड येथे हा सृष्टी निर्मीत ॐकार म्हणजे एक अद्भूत तिर्थक्षेत्र तपोभूमी असल्याने त्यांनी वनवासातील मध्यंतरीचा संपूर्ण कालखंड येथे घालविला त्यांचे या ठिकाणी सृष्टी निर्मीत ॐकाराच्या मध्य भागी जमीनीच्या पोटात वनवास कालीन वास्तव्याचा संपूर्ण दरबार उघड झाला आहे.

प्रभुरामचंद्राच्या या दरबारात मुख्य महालात उत्तर बाजूस भुयारी स्वरुपातील शिव मंदीर असून आतील खोल भुयारी ओवरीत स्वयंभू शिवलिंग असून त्याच्या वरिल बाजूस श्री गणेशाचा गाभारा आहे. या मुख्य शिव मंदीराचा बाजूस ऋषी मुनीचे जथे उतरण्यासाठी एकात एक अशा कमान असलेल्या दोन मोठया ओवया आहेत. त्याच्या बाजूस त्याकाळी स्थापन केलेल्या वैशिष्टयपूर्ण रचना असणाऱ्या बारा जोर्तीलींगाच्या बारा कमानी आहेत. त्यामध्येच एका ओवरीरुपी खोलीत दत्त मंदीर आहे. त्यांच्या वरच्या बाजूस पाच महासमस्या बैठया स्वरुपात असून त्यापैकी एक दत्त मंदीरात खालच्या बाजूने उघड झालेली पहावयास मिळते याच मुख्य हेतून महालाच्या लगतच पुर्वेकडील बाजूस प्रभूरामचंद्राचे वास्तव्याचे ठिकाण असून त्या ठिकाणी त्यांचे कुळ दैवत त्याचे सुर्यमंदीर, बैठक खोली, स्वयपाक घर, बेडरुम, लक्ष्मणाची कुटी व धान्य कोठार, न्हानी घर, अंगण व उकीरडा मुळ जांभ्या दगडात कोरीव स्वरुपात आहे. तेथूनच ५० मी. अंतरावर बाजूस दरडीस सुर्य आराधना करणेचे प्रभुरामचंद्राचे तपोस्थान आहे. त्या ठिकाणी एकात एक दोन अप्रतिम कमानी कोरीव स्वरुपात असून त्यामध्ये शिवलींग उघड झाले आहे. सदरचे ठिकाण हे प्रभू रामाचे वनवासातील वास्तव्याचेच ठिकाण असत्याबाबत एक अद्भूत पुरावा पुढे आलेला आहे.

सदरचे पुण्या भुमीस प्राचीन ऋषीमुनी, प्रभू रामचंद्र, परशुराम, पांडव समर्थ श्री रामदास स्वामी, छत्रपती शिवाजी महाराज इ. चा पदस्पर्श झालेला असून काही काळ वास्तव्य झालेले आहे. हे तेथील माहिती घटना व वैशिष्टयपूर्ण खुणा या आधारे स्पष्ट होते. याच बरोबर किल्ले समानागड आपरिचित इतिहासाची सता देत आहे.

सदरच्या ठिकाणाचा सृष्टीनिर्मीती पासून असलेला प्राचीन तसेच आर्वाचीन घटनांचा, ठिकाणांचा शोध घेण्याचे काम सार्वजनिक बांधकाम खाते गडहिंग्लज येथे काम करत असलेले शाखा अभियंता श्री. के. टी. शेलार यांनी घेतलेला असून सदर ठिकाणांचा व शोध कार्याचा मागोवा अभ्यासकांनी संशोधकांनी तसेच पुराण वस्तू खात्याने घ्यावा तसेच सदर ठिकाणांची पहाणी पर्यटन महामंडळाने तसेच शासनाने करुन खात्री करुन हे एक अप्रतीम तिर्थक्षेत्र घोषीत करावे अशी मागणी तालुक्यातील जनता, लोकप्रतिनीधी, आमदार श्री. बाबासाहेब कुप्पेकर, माजी आमदार श्री. श्रीपतराव शिंदे तसेच जि. प. उपाध्यक्ष श्री. रामाप्पा करीगार ता. शिवसेना प्रमुख श्री. विलास यमाटे यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे.

प्रभाकर पुंडलीक



ॐ स्वरुपातील सृष्टी निर्मित सामानगड डोंगर, ता. गडहिंग्लज.

### गडहिंग्लज विकासासाठी खासदार आमदार निधीतून ३० लाख रुपये मंजूर

गडहिंग्लज (महेंद्र कांबळे यांजकडून) खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्या निधीतून २० लाख रुपये व आमदार बाबा कुपेकर यांच्या निधीतून १० लाख रुपये असें एकूण ३० लाख रुपये गडहिंग्लज तालुक्यात विविध कामासाठी मंजूर झाल्याचे आमदार बाबा कुपेकर यांनी सांगितले.

खासदार निधीतून नांगनूर सांस्कृतीक सभागृह रु. १,६०,०००/ - चन्नेकुप्पी सांस्कृतिक सभागृह रु. २,६८,३७७ नूल गावातील रस्ते - रु. २,५६,३५५ कानडेवाडी खडीकरण व डांबरीकरण रु. १,०७,६२० महागांव नदीघाट बांधणे रु. २,८९,५९४ मुगळी महात्मा गांधी वाचनालय इमारत बांधकाम रु. २,४०,७९९ महागांव खडीकरण व डांबरीकरण रु. २,७२,६२७ असे एकूण रु. ३०,००,००० मंजूर.

आमदार निधीतून कानडेवाडी कुप्पे - पाण्याची टाकी व रस्ते तयार करणे रु. १,६४,७२०, अर्जुनवाडी गावातील रस्ते रु. २,१४,१७४, तळेवाडी गावातील रस्ते २,००,१९१ नूल मुस्लीम स्मशान भुमी कुंपण रु. २,०८,८१४, कडगांव स्मशान शेड रु. ९७,२७४ असे एकूण रु. ३०,००,००० रुपये मंजूर झाले असून येत्या मार्च महिन्यापूर्वी वरील कामे पूर्ण होतील असेही आमदार बाबा कुप्पेकर यांनी सांगितले.


**गडहिंग्लज कृषी उत्पन्न बाजार समिती, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर**

राजश्री शाहू बाजार आवार गडहिंग्लज

स्थापना - १५/११/१९४७

फोन नं. २२२१७

**शेतकऱ्यांची उन्नती हीच राष्ट्राची उन्नती**

शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळवून देऊन त्यांच्या विश्वासाला पात्र व त्यांना आधारभूत वाटणारी आदर्श बाजार समिती, शेतकरी व व्यापारी यांना देवघेवीच्या व्यवहारासाठी उपलब्ध करून दिलेल्या खास सुख सोयी, बंदीस्त बाजार आवार, शेतकरी निवास, सेल हॉल, दुकानगाळे, जनावरांचे शेड, वीज, पाण्याची व्यवस्था.

**बाजार समितीची वैशिष्टये**

शेतीमालाची बाजार समितीच्यां देखरेखी खाली उघड लिलांवाने विक्री, वजन, हिशोब वगैरे बाबींवर देखरेख आडत, तोलाई, हमाली, वगैरेंचे अधिकृत व निश्चित दर माल विक्रीसाठी प्रतवारीची योजना.

तसेच गडहिंग्लज येथील जनावरे, शेळयामेंढया यांचा बाजार बाजार समितीच्या नियंत्रणाखाली सुरु आहे.

**वालनेस अंतोन बार्देस्कर**, सचिव
**सखाराम आबा देसाई**, उपसभापती
**शिवाजीराव दशरथ खोत**, सभापती
व
सर्व संचालक मंडळ
गडहिंग्लज कृषी उत्पन्न बाजार समिती, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.


Scanned by CamScanner

# परिवर्तनवादी चळवळीला बळ देण्याची गरज : निळू फुले

कोल्हापूर : परिवर्तनवादी चळवळीत काम करणाऱ्यांनी नैराश्य झटकून चळवळीला बळ देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते व प्रसिद्ध अभिनेते निळू फुले यांनी रविवारी केले.

'सत्यशोधक केशवराव विचारे समग्र वाङमय' या हरी नरके यांनी संपादित केलेल्या ग्रंथाच्या प्रकाशन कार्यक्रमात श्री. फुले अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्याहस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. साळुंखे म्हणाले की, बहुजन समाजाला वेगळी दिशा देण्याचे काम केशवराब विचारे यांनी आपल्या विचारातून व लेखनामधून केले. देशातील सामान्य माणसाच्या जीवनाचे तत्वज्ञान उभे करण्याचा प्रयत्न आपल्या चळवळीतून विचारे यांनी केला. नरके यांनी त्यांच्या वाङमयाचा ग्रंथ प्रकाशित करून एका उपेक्षित कार्यकर्त्याला न्याय दिला आहे. त्याचबरोबर परिवर्तनवादी चळवळीला बळ देण्याचे कामहि केले आहे. ही चळवळ फसू नये, यासाठी चळवळीचा इतिहास डोळसपणे पाहण्याची गरज आहे. परिवर्तनवादी चळवळीने समाजामध्ये विश्वास निर्माण केल्यास ही चळवळ जोमाने वाढू शकेल.

प्रारंभी हरी नरके यांनी प्रास्ताविक करून ग्रंथ संपादनामागील हेतु सांगितला. शेवटी अखिल भारतीय सत्यशोधक समाजाचे उपाध्यक्ष वसंतराव फाळके यांनी आभार मानले.



कोल्हापुरात 'सत्यशोधक केशवराव विचारे समग्र वाङमय' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी हरी नरके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. आ. ह. साळुंखे आणि अभिनेते निळू फुले आदि उपस्थित होते.

# सामानगड किल्ल्याचा पर्यटनस्थळात समावेश

गडहिंग्लज (वार्ताहर) : गेली अनेक वर्षे वारंवार मागणी होऊनहि उपेक्षित राहिलेल्या सामानगड किल्ल्याला दिवस चांगले येणार आहेत. सामानगड किल्ल्याचा पर्यटनस्थळात समावेश झाला असल्याची माहितीं संग्राम नलावडे यांनी काल दिली.

शिवस्पर्शानि पवित्र झालेल्या ऐतिहासिक सामानगडाला पर्यटन स्थळ म्हणून दर्जा मिळावा, यासाठी संग्राम नलावडे यांनी शासनाचे लक्ष वेधले होते. दि. २९ नोव्हेंबर ९९ रोजी मुख्य मंत्री विलासराव देशमुख आणि पालक मंत्री पतंगराव कदम यांच्याकडे निवेदनात त्यांनी मागणी केली होती.

दि. ८ नोव्हेंबर १९९६ च्या जिल्हा नियोजन व विकास मंडळाची सभा १ जुलै १९९८ रोजी झाली. या सभेत २० पर्यटन स्थळे 'क' श्रेणीतील पर्यटनस्थळे म्हणून घोषित करण्यात आली. त्यात किल्ले सामानगडाचा समावेश करण्यात आल्याचे पत्र संग्राम नलावडे यांना गृहविभागाकडून आले आहे. या पत्रावर गृहविभागाचे कक्ष अधिकारी म. य. पेडणेकर यांची सही आहे.

## विक्रीकर कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे 'जादा काम' आंदोलन यशस्वी

कोल्हापूर : वेतनश्रेणीसह विविध मागण्यांसंदर्भात महाराष्ट्र विक्रीकर कर्मचारी संघटनेच्या आदेशाप्रमाणे कोल्हापुरातील तीनहि विक्रीकर कार्यालयातील तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांनी दि. २१ मार्च ते २४ मार्च या कालावधीत दोन तास 'जादा काम' करून अभिनव पद्धतीने आंदोलन १०० टक्के यशस्वी केले.

शहरातील जयधवल इमारत, लक्ष्मीपुरी, जे. एम. ड्रेसेस, पुणे-बेंगलोर रोड व रघुकुल इमारत, सुभाष रोड या तीनहि विक्रीकर कार्यालयातील सर्व तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांनी विक्रीकर निरीक्षकास पाच हजार ५०० ते ९००० रुपये ही वेतनश्रेणी तात्काळ मंजूर करावी, या मागणीसाठी कार्यालयीन वेळेनंतर दोन तास जादा काम करून आपले आंदोलन १००

Scanned by CamScanner

सकाळ १४ फे १९९९

# महाशिवरात्री

हिंदू लोकांनी ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तीन देवता मुख्य मानल्या होत्या. त्यांची पूजा, उपासना करण्याची पद्धत त्यांनी मानली आहे. शिवाच्या नेहमीच्या पूजेसाठी सोमवार हा दिवस मानला आहे. तसेच प्रत्येक महिन्यातील वद्य चतुर्दशी ही शिवरात्र मानतात. माघ महिन्यातील चतुर्दशीला 'महाशिवरात्र' म्हणतात. नित्य शिवरात्र, पक्षशिवरात्र, मासशिवरात्र, योगशिवरात्र व महाशिवरात्र असे शिवरात्रीचे पाच प्रकार सांगितले आहेत.

## 'आपले सण, आपले उत्सव'

डॉ. स्वाती कर्वे


निसर्गामध्ये आनंद देणाऱ्या, पवित्र अशा गोष्टी जशा आहेत, तशाच भीतिदायक घटनाही आहेत. आकाशातील मेघांची गर्जना, वादळे, विजा चमकणे, भूकंप, आदी गोष्टीही घडत असतात. या घटनांमध्येही एक शक्ती आहे. निसर्गाचे हे रौद्र म्हणजे भीतिदायक रूप आहे, हे प्राचीन ऋषी-मुनींना जाणवले होते. त्याला त्यांनी 'रुद्र' असे नाव दिले. जगातील अनेक गोष्टींचा नाश करण्याचे सामर्थ्य असणारी देवता लोकांनी महत्त्वाची मानली. जगाचे संरक्षण करणारा, तसेच जगाचा नाशही करणारा देव म्हणून शिवाला आर्यांनी महत्त्वाचे मानले. दोन पायांची माणसे आणि चार पायांचे प्राणी या सर्व सजीवांवर त्याची सत्ता आहे. सर्वांत उंच पर्वत हिमालय येथे तो राहतो. त्यामुळे तेथील औषधी वनस्पतींचे त्याला ज्ञान आहे, अशी कल्पना करून त्याला 'भिषग्वर' मानले आहे. पुराण लिहिणाऱ्यांनी शिवाचे सामर्थ्य सुचवणारी अनेक नावे त्याला दिली आहेत. पशुपती, गिरीश, नीलकंठ, जटाधारी, शर्व, शिव, शंकर, धनुर्विद्यापटु ही प्रमुख नावे आहेत.

शिवाची उपासना करताना आपण शिवलिंगाची पूजा करतो. 'शिवलिंग' हे शिवशक्तीचे प्रतीक मानले आहे. संपूर्ण भारतात शिवाची महत्त्वाची बारा मंदिरे आहेत. त्यांना बारा ज्योतिर्लिंगे असे म्हणतात. शिवाला गायन, नृत्य, नाट्य यांचाही देव मानले आहे. 'नटेश्वर', 'नटराज' ही शिवाची नावे आहेत. शिव संतापले की जे नृत्य करतात ते 'तांडवनृत्य' नावाने प्रसिद्ध आहे.

या शिवाचा वर्षातून एकदा होणारा मोठा उत्सव म्हणजे 'शिवरात्र' होय. साधारणपणे पाच ते सहा हजार वर्षांपासून 'महाशिवरात्री'चा दिवस साजरा होत आला आहे.

या दिवशी उपवास, जागरण व शिवपूजा यांना महत्त्वाचे मानले आहे. महाशिवरात्रीचे महत्त्व सांगणारी एक कथाही सांगितली जाते.

एक शिकारी एका झाडावर शिकार करण्यासाठी बसला होता. तेथेच एक तळे होते. हरणांचा एक कळप तळ्यावर पाणी पिण्यासाठी आला. शिकाऱ्याने त्यांच्यावर धनुष्यबाण रोखला. तेव्हा हरणांनी त्याला विनवणी केली, की आम्ही घरी जाऊन आमच्या मुलांना भेटून सकाळी परत तुझ्याकडे येतो. शिकाऱ्याने त्यांना सकाळी येण्यास सांगितले. रात्रभर हरणांची वाट बघत असताना त्याने झाडाची पाने तोडून खाली टाकली. ते झाड बेलाचे होते. झाडाखाली एक शिवलिंग होते. त्यावर बेलांच्या पानांचा अभिषेक रात्रभर होत राहिला. शिकारी रात्रभर जागा होता. सकाळी हरणांचा कळप कबूल केल्याप्रमाणे तळ्यापाशी आला. त्यांचा प्रामाणिकपणा बघून शिकाऱ्याला त्यांना मारावेसे वाटेना, त्याच्याही हातून बेलाच्या पानांचा



अभिषेक शिवलिंगावर झाला होता. रात्रीचे जागरण झाले होते. त्याचा स्वभाव बदलून गेला. त्याने शिकार केली नाही. शिकारी व हरीण दोघांनाही मुक्ती मिळाली. हा दिवस शिवरात्रीचा होता, असे सांगतात.

त्रयोदशीला म्हणजे आदल्या दिवशी एक वेळ जेवण करून उपवास करावा, दुसऱ्या दिवशी संध्याकाळी नदीवर जाऊन स्नान करावे, शंकरांच्या देवळांत जाऊन पूजा करावी, शिवाला कमळे, बेलाची पाने वाहावीत, रात्री जागरण करून पोथी, पुराण ऐकावे, दुसऱ्या दिवशी गोड पक्वान्न करून उपवास सोडावा, असे सांगितले आहे. आजकाल फक्त उपवास करणे व मंदिरात जाऊन दर्शन घेणे एवढेच होताना दिसते. समाजाच्या सर्व थरांतील माणसे या दिवशी शंकराची पूजा करतात. शंकराच्या देवळांतून या दिवसात उत्सव होतो. गावांतून जत्रा भरतात. ठाणे जिल्ह्यातील आगाशी, सातारा जिल्ह्यातील बाहुले, कोल्हापूरजवळ भिमासागरी, देवगडजवळ हरेश्वर येथे, तसेच धोम, नगरजवळ डोंगरगाव इत्यादी ठिकाणी महाशिवरात्रीनिमित्त जत्रा होतात.




इतर देवांप्रमाणेच बेलाच्या झाडाचे शंकराबरोबर नाते जडले आहे. बेलाचे त्रिदल शंकराला वाहतात. शंकराच्या त्रिशूलाचे ते प्रतिक आहे. महाशिवरात्रीपर्यंत पौषातील थंड कमी होऊन हवेत गरमपणा जाणवण्यास सुरवात झालेली असते. खाण्यावर बंधन घालणारी शिवरात्र लगेच येतेच. पोटातील वात कमी करण्याचे गुणधर्म बेलामध्ये आहेत. बेलाची पाने पाण्यात भिजत टाकून ते पाणी प्यायले, तर पोटाचे आजार बरे होतात.

अकोळे यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रा. श्रीपाल जर्दे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची कल्पना मांडली. कृतज्ञता या अंकाचे प्रकाशन पी. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. बाहुबली ब्रह्मचर्याश्रम आणि बाहुबली विद्यापीठ या मातृसंस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच समाज व राष्ट्राच्या भव्यकुमार चौगुले, धन्यकुमार शेटी, डॉ. भोजराज शिखरे यांनी केले. डॉ. रावसाहेब पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर शेवटी या कृतज्ञता समारोह समितीचे कार्यवाह ब्रलराज महाजन यांनी आभार मानले व माजी विद्यार्थ्यांची पुढील बैठक १६ जानेवारीला होईल असे जाहीर केले.

पेजारवाडी, चांद (ता. राधानगरी), चिंचवाड (ता. ...वार), ... भोजनपात्र उत्सव समिती, शिरोळ आदी ठिकाणच्या दत्त मंदिरात दत्त जयंतीनिमित्त प्रवचन, कीर्तन, भजन, जागर, पारायण व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २३ डिसेंबरअखेर चालणाऱ्या या जयंती उत्सवांतर्गत काही ठिकाणी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे फुलेवाडी येथील बालगणेश तरुण मंडळातर्फे दि. २२ रोजी रांगोळी व गुरूदेव दत्त पालखी मार्गावरील सजावट या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तर जाधववाडी येथील दत्त भक्त मंडळातर्फे दि. २२ रोजी रांगोळी स्पर्धा, दि. २३ रोजी महिला व पुरुष गटाच्या संगीत खुर्ची स्पर्धा व दि. २४ रोजी रेकॉर्ड डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

# स्त्रीमुक्तीची चळवळ एकाकीपणे राबवून यशस्वी होणार नाही - डॉ. साळुंखे

## ७ व्या विचारवेध संमेलनाची यशस्वी सांगता


भाई दाजीबा देसाईनगर, बेळगाव, दि. १९ (वार्ताहर): स्त्री-मुक्ती चळवळ एकाकीपणे राबवून यशस्वी होणार नाही. ही चळवळ दलित, गरीब यांच्या शोषक विरोधी चळवळीशी जोडली गेली पाहिजे तरच चळवळीला चांगला आकार येईल, असे विचार ७ व्या विचारवेध संमेलनाचे अध्यक्ष डॉ. आ. ह. साळुंखे यांनी संमेलनाच्या समारोपप्रसंगी व्यक्त केले.

तीन दिवस चाललेल्या विचारवेध संमेलनाचा आढावा घेऊन संमेलनात जुनी, मधली आणि तरुण पिढीचा संगम होऊन परिवर्तन चळवळीला नव्या पिढीकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. न्यायाची आणि माणुसकीची समाज व्यवस्था निर्माण करणे हा परिवर्तनाच्या चळवळीचा गाभा असल्याचे स्पष्ट करून ते पुढे म्हणाले, शोषित, पीडित वर्गातही खूप गुणवत्ता आहे. त्यांना संधी मिळाली पाहिजे. त्यांची सुप्त शक्ती जागी करून ती विकसित करण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. भावीकाळात परिवर्तनवादी चळवळीला अवघड लढाई लढावी लागणार असून बहुसंख्य दुर्लक्षित समाजाला विकसित वर्गाबरोबर नेण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागणार आहेत.

प्रारंभी डॉ. आंबेडकर अकादमीचे कार्याध्यक्ष किशोर बेडकीहाळ यांनी आपल्या प्रास्ताविकात तरुण अभ्यासकांच्या सहभागातून संमेलनाला स्फूर्ती मिळाल्याचे स्पष्ट करून बेळगावच्या संमेलनात महिला वर्गाने दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल गौरवोद्गार काढले. बेळगावच्या संयोजन समितीने संमेलनाची चोख व्यवस्था आणि तत्पर सेवा उपलब्ध केल्याबद्दल त्यांनी धन्यवाद दिले. पुढील वर्षी सावंतवाडी येथे ८ वे विचारवेध संमेलन भरणार असल्याचे त्यांनी घोषित केले. शेवटी माजी प्राचार्य व्ही. ए. पाटील यांनी संमेलनाला उपस्थित प्रतिनिधी, श्रोते, संमेलनात सहभागी झालेले अभ्यासू व्याख्याते, तसेच सर्व सहाय्यभूत संस्था, व्यक्तींचे यथोचित शब्दांत आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आनंद मेणसे यांनी केले.

स्त्रियांच्या आणि दलितांच्या गुलामगिरीला मनु संस्कृती जबाबदार असून अजून स्त्री खऱ्या अर्थाने मुक्त नाही, अशी खंत दिल्ली येथील इतिहासाच्या प्राध्यापिका आणि पंडिता रमाबाई यांच्यावरील इंग्रजी चरित्रग्रंथाच्या लेखिका डॉ. उमा चक्रवर्ती यांनी व्यक्त केली. येथील भाई दाजीबा देसाईनगर येथे आयोजित ७ व्या विचारवेध संमेलनाच्या शेवटच्या सत्रात 'इतिहासाचे पुनर्लेखन आणि स्त्रिया' या विषयावर त्या बोलत होत्या.


भावपूर्ण श्रद्धांजली



कै. सुमनलाल मणीलाल शाह

आमचे स्नेही श्री. सुमनलाल मणीलाल शाह यांचे दुःखद निधनाने त्यांच्या कुटुंबियावर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिर:शांति देवो, हीच प्रार्थना.

▸ नगराज, बाबुलाल, विमलचंद केवलचंद, पारसमल, ललीत आदि समस्त मेहता परिवार

▸ मेहता टायर्स, पूना-कोल्हापूर


# किल्ले सामानगड पर्यटन क्षेत्र घोषित करण्याची मागणी

गडहिंग्लज, दि. १९ : ऐतिहासिक किल्ले सामानगड हा पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित व्हावा, अशी मागणी येथील नलवडे डेअरीचे चेअरमन व कार्यकारी संचालक संग्रामसिंह आप्पासाहेब नलवडे यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली असून त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांचे अवर सचिव यांनी पत्राद्वारे नलवडे यांना कळविले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, किल्ले सामानगड हा ऐतिहासिक किल्ला असून या किल्ल्यावर पुरातन शिवलिंग मंदिर, श्री अंबाबाई देवालय, सात कमानीची विहीर, मोंगलाई टेकडी, जवळच सरसेनापती प्रतापराव गुजर यांची समाधी आहे. हा ऐतिहासिक किल्ला पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करावा. या किल्लाकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. हा किल्ला शिवकालीन असून या किल्ल्याचे बांधकाम समर्थ स्वामी रामदास यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले होते, असे ऐतिहासिक पुरावे आहेत. हा किल्ला नागरिकांना इतिहासप्रेमींना मार्गदर्शक ठरणारा आहे. यासाठी किल्ले सामानगड पर्यटन क्षेत्र घोषित व्हावा असेही शेवटी म्हटले आहे.

## सौंदत्ती यात्रेसाठी हजारो भाविक रवाना

कोल्हापूर, दि. १९ : सौंदत्ती येथील श्री रेणुका देवी यात्रेसाठी (यलम्मा डोंगर) कोल्हापुरातून आज ११० एस. टी. बसेस रवाना झाल्या तसेच खासगी वाहनातूनही हजारो भाविक रवाना झाले आहेत.

मंगळवार दि. २१ डिसेंबर रोजी मार्गशीर्ष पौर्णिमा हा यात्रेचा मुख्य दिवस आहे. काल रात्रीपासून खास यात्रेसाठीच्या एस. टी. बस जात असून उद्याही काही बसेस निघणार आहेत.

सामुदायिकरीत्या यात्रेस जाण्याची परंपरा असल्याने शिवाजी पेठ, मंगळवार पेठ आदी परिसरातून खास यात्रेसाठी नैमित्तिक कराराने एस. टी. बसेस घेऊन मोठ्या संख्येने भाविक यात्रेस रवाना झाले आहेत. श्री रेणुका भक्त मंडळ तसेच अन्य मंडळांनी यामध्ये पुढाकार घेतलेला आहे. राज्य परिवहन महामंडळानेही खास यात्रेसाठी बससेवा सुरू ठेवली आहे. यासाठी पाच गाड्या तैनात करण्यात आल्या आहेत.


## मोटारसायकल घसरून दोघे जखमी

कोल्हापूर, दि. १९ : मोटारसायकल घसरून आज रात्री राक्षी फाट्यानजीक झालेल्या अपघातात सुनील तुकाराम भोईटे (वय ३०, रा. ४०९ ए शिवाजी पेठ) आणि विलास बाळकृष्ण

## चारित्र्याच्या संशयावरून पत्नीवर वार करून पतीची आत्महत्या

सोलापूर, दि. १९ (वार्ताहर) : आपली पत्नी ही बाहेरख्याली असल्याचा संशय घेऊन


उठमणू




पुढारी दि १९.१२.१९९९


Scanned by CamScanner

साक्षीनं निसर्गाच्या कुशीत 'एन्जॉय' करावी अशी प्रत्येकाचीच मनीषा असते. यासाठी 'तसं' एखादं देखणं ठिकाण हवंहवसं वाटतं. ते शोधण्यासाठी मग त्यातल्या त्यात फिरून आलेल्या फिरस्त्यांचा सल्ला, त्यांच्या सल्ल्यानुसार कधी गोकाक, कधी ठोसेघरचा धबधबा. हेही फिरून पाहून झाले की मग काय? आहे, अजूनही आहे. तो म्हणजे शाहूवाडीचा 'नायगरा' म्हणून ओळखला जाणारा 'बर्की'चा धबधबा!

बर्की कोल्हापूर जिल्ह्यातील आणि शाहूवाडी तालुक्यातील एक छोटंसं ... लाभला. पण महाराष्ट्रातही अशी सुमारे

**डी. आर. पाटील**

१९ गावे असल्याचे सांगण्यात येते. त्यापैकीच बर्की हे गाव. इतिहासाशी अशी नाळ जोडणारं हे गाव असलं तरी आज ते एका विशिष्ट गोष्टीने चर्चेत आहे आणि ते म्हणजे बर्की येथील देखण्या, मनोहारी आणि विहंगमयी हिरव्याकंच वनश्रीचे नटलेल्या डोंगरांना साक्षी ठेवून कोसळणाऱ्या बर्की अर्थात् तापेरा धबधब्यामुळे!

बर्कीला जाण्यासाठी रस्तेमार्गे म्हणजे बर्कीला जाण्यासाठी दक्षिणेस फाटा फुटला आहे. या मार्गावरून बर्कीत शिरताना सुळाचा, आसुळणे आणि निकाग्रे हे छोटे छोटे धबधबे आपली नजर वेधून घेतल्याशिवाय आपणास पुढच्या प्रवासात जा म्हणत नाहीत आणि मागे फिरताना हे छोटे धबधबे आपणास निरोपाचे देणे देण्यास विसरत नाहीत. तेही पुन्हा फिरूनी येण्यासाठी. शाहूवाडीतून बर्कीला जायचे झाल्यास मलकापूर - मोसम आणि बर्की हा ३५ ते ३८ कि. मी. चा प्रवास आहे. धबधब्या ठिकाणी वाहने जात नसल्याने येथील निसर्ग अगदी अवखळपणे मजा करतो. कारण एक तर नजर कमी यासाठी चष्म्याचा आधार आणि चष्म्यावर जर धुके साठले तर अशा लोकांची फार मजा होते. धबधबा पूर्वेकडून कोसळतो असल्याने दोनप्रहरीनंतर पश्चिमेकडे वारे कोसळणाऱ्या जलधारांत मस्ती करण्यासाठी घुसतो, तेव्हा काळ्या कातळाला धडक देऊन परत फिरणारा हा वारा तुषारांचे लोटच्या लोट बरोबर घेऊन माघारी फिरतो आणि हौशी पर्यटकांच्या अंगावर धुक्यांची शाल

---

# ॐ स्वरूपातील सामानगड

प्रभु रामचंद्र, समर्थ रामदास आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पवित्र बनलेला सामानगड आणि प्रतापराव गुजर स्मारक हे गडहिंग्लज तालुक्यातील इतिहासाचे दोन साक्षीदार आहेत. समुद्रसपाटीपासून २६०० फूट उंच आणि २६० फूट रुंदीचा गडहिंग्लजच्या दक्षिणेला सहा कि. मी. अंतरावर दीर्घ वर्तुळाकार माथा लाभलेला सामानगड अनेक पर्यटकांना आकर्षित करतो.

दक्षिण महाराष्ट्रातील प्रमुख पंधरा किल्ले बांधण्याचे श्रेय भोजराजा (दुसरा) याला दिले जाते. या किल्ल्यांपैकी सामानगड हा होय. सामानगड हा मुख्यत: पुरवठागड असावा. शिवाजी

**दत्ता देशपांडे**

महाराजांच्या स्वराज्यात हा गड सामानाच्या म्हणजे युद्धसाहित्य, अन्नधान्यादी जीवनावश्यक साहित्य यांच्या साठ्यासाठी, पुरवठ्यासाठी वापरला गेला. यावरूनच गडाचे नाव सामानगड असे रूढ झाले असावे असे वाटते.

कोल्हापूर प्रांतावर ज्यांचे प्रभुत्व, त्यांच्याच ताब्यात सामानगड असावयाचा हे ठरून गेले होते. तसा या गडाला अति प्राचीन इतिहास आहे. सामानगडावर जो ताम्रट सापडला, त्यावरून तो राष्ट्रकुटाचा सातवा राजा शांतीदुर्ग किंवा शांतिवर्य यांच्या ताब्यात असावा. हा ताम्रपट शके ६७५ म्हणजे इ. स. ७५३-५४ सालचा आहे. इ. स. ९७३ नंतर तो चालुक्यांच्या आधिपत्याखाली गेला. पश्चिम चालुक्यांचे जे महामंडलेश्वर शिलाहार राजे त्यांनी इ. स. १०५० पासून ११२० पर्यंत राज्य केले. त्यानंतर देवगडच्या यादव राजांनी हा प्रांत घेतला. इ. स. १३४७ मध्ये मुसलमानांनी दक्षिण देश जिंकेपर्यंत हा भाग यादवांच्याच ताब्यात होता.



अप्रतिम निसर्ग सौंदर्याचे दर्शन घडवणारे टेहळणी बुरुज

मुसलमानी राजवटीत गडाचे उल्लेख फारसे आढळत नाहीत. मात्र हा गड स्वराज्यात आल्यावर खुद्द शिवाजी महाराजांनी त्याच्या बांधकामाकडे लक्ष दिले. समर्थ रामदास यांचे गडावर तीन दिवस वास्तव्य असल्याचे कागदोपत्री पुरावे आहेत. पुढे स्वराज्य संपले, पेशवाई बुडाली आणि सामानगड पुन्हा उजेडात आला तो इंग्रजांविरुद्ध केलेल्या बंडामुळे!

सावंतवाडीकरांनी उभारलेल्या उठावात सामानगडही सामील झाला. १८१८ पासून १८५७ पर्यंत हिंदुस्थानी फौजांनी इंग्रजी साम्राज्याला जे हादरे दिले, त्यात १८४५ साली झालेला सामानगडचा उठाव महत्त्वाचा आहे. गडकरी मुंजाप्पा कदम (नाईक) याने पराक्रमाची शर्थ करून गड राखण्याचा प्रयत्न केला पण अखेर हा गड इंग्रजांच्या ताब्यात गेला. नंतर सामानगडाचे महत्त्वही मागे पडत गेले.

सामानगडाचे गडकरी म्हणून कै. दिनकरराव शिंदे यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून सामानगडाकडे सर्वांचेच लक्ष वेधले. १९५७-५८ पासून चौकुळचे यशवंत महाराज गावडे यांचेही सामानगडावर वास्तव्य होते. या शिवाय रामदासांचे भक्त निळकंठ महाराज रामदासी यांनी तर आपली हयात गडावरच घालविली. आजही ते समर्थांचे कार्य निभावून नेत आहेत.

सामानगड परिसराला आज खूपच देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे. वन विकास महामंडळाने १६५ हेक्टर क्षेत्रात दोन लाख झाडे लावली आहेत, तर सामाजिक वनीकरण विभागामार्फत दहा हेक्टर क्षेत्रात सोळा हजार झाडांची लागवड करून गडाच्या सौंदर्यात भर टाकली आहे. गडावर उभे राहून क्षितिजाकडे नजर फेकल्यास पन्नास कि. मी. परिसर दृष्टीपथात येतो. कर्नाटकातील हिडकल प्रकल्पाचा विशाल जलाशय, हरगापूरचा वल्लभगड तेथील पवनचक्क्या, हिडकल जवळील मच्छिंद्रगड, भुदरगड परिसरातील रांगणा किल्ला, चंदगडजवळील महिपालगड, गंधर्वगडसह सात किल्ले आणि आंबोली परिसरही आपले लक्ष वेधून घेतो.

**गडाचे विलोभनीय दर्शन**

सामानगड परिसर म्हणजे सृष्टीचा एक अद्भुत चमत्कार आहे, असा दावा करून पाटबंधारे खात्यात काम करणारे के. टी. शेलार म्हणतात, सामानगड परिसर ओम स्वरूपात दिसतो. इथे कठीण दगडावर उखळीसारख्या अतिप्राचीन खुणा आहेत. याशाठी पुरातत्त्व खात्याने संशोधन करणे गरजेचे असल्याचे सांगून (पान १२ पाहा)

दै. लोकसत्ता (शुक्रवार दि ४ जुलै २००३)

Scanned by CamScanner

दै. लोकसत्ता क्षेत्रा पुरवणी शुक्रवार ३ ऑक्टो २००३

# ॐ स्वरुपातील सामानगड

(पान १ वरून)

सामानगड एक उत्कृष्ट आध्यात्मिक केंद्र असल्याचा दावा केला आहे व पर्यटकांसाठी ते सातत्याने मार्गदर्शन करतात. त्यांनी अनेक ठिकाणे शोधून काढली आहेत.

रामखडी या ठिकाणी प्राचीन सूर्यमंदिर आहे. इथे सूर्याची बारमाही किरणे येतात. याच ठिकाणी शिवलिंग स्थापन केले आहे. सूर्योदय आणि पौर्णिमेचा चंद्रोदय पाहण्याचा अद्भुत योग येतो. म्हणजे इथे दोन्ही डोंगरांमध्ये सूर्य दक्षिणायन आणि उत्तरायण कक्षेत उगवतो.

याशिवाय सनसेट पॉइंट, गायमुखतीर्थ, गुप्त उगमस्थान, तपोस्थान भुवारी स्वरूपातील रामदरबार, शिवलिंग, लक्ष्मणरेखा, वनवासात असताना प्रभू रामचंद्राचे वास्तव्याचे ठिकाण, बैठखा खोली, लक्ष्मण कुटी, महासमाधी, सतीकुंड, प्राचीन काळातील चुली, न्हाणीघर, सूर्यमंदिरे, समर्थांनी स्थापन केलेले मारुती मंदिर, वाघाची गुहा, भवानी माता मंदिर आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या उपस्थितीत, समर्थ रामदासांनी दगडातून बेडकी काढलेले ठिकाणही अस्तित्व दाखवते.

मुख्य किल्ल्याच्या परिसरात सात कमानींची विहिर सर्व पर्यटकांचे आकर्षण आहे. आठ फूट उंचीचा भव्य तट भग्नावस्थेत आजही ताठ मानेने उभा आहे. टेहळणी बुरुज अद्यापही इतिहासातल्या घटना जाग्या करतो.

अनेक मान्यवरांच्या प्रयत्नाने सामानगड एक पर्यटन केंद्र म्हणून विकसीत होत आहे. गडावरील काही रस्त्यांचे डांबरीकरण गतीने पूर्ण झाले आहे. भग्नावस्थेत असलेल्या मारुती मंदिराचे बांधकामही पूर्ण झाले आहे. भीमशाप्पा यांच्या समाधीमंदिराचे काम पूर्ण करण्यात आले असून सामानगड सुशोभीकरणाचे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार आहे.

सामानगड येथे दूरदर्शन केंद्र व्हावे ही मागणी रेटूनही अद्याप शासनाचे लक्ष नाही. तथापि अनेक सेवाभावी संस्था, दानशूर व्यक्ती यांच्या माध्यमातून सामानगडचे स्वरूप बदलेल यात शंका नाही. ■


हार्दिक शुभेच्छा

आपल्या महालक्ष्मी फॉरेन प्लेसमेंट तर्फे श्री.तानाजीराव झपाटे (तडसरकर) यांच्या अथक परिश्रम व योग्य मार्गदर्शनाखाली सातारा, सांगली या जिल्ह्यासह गोव्यातील १०० होतकरु तरुण पॅन अमेरिकन क्रु ज कार्पो.अमेरिका येथे दरमहा ७५ हजार ते २ लाख रुपये पगारावर लवकरच रवाना होत आहेत. आमच्याकडे ७ वी नापास ... शिक्षण घेतलेल्या सर्वांसाठी

...च्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



सत्यजित पाटील

जि. प. सदस्य



वसंत पाटील (आप्पा)

उपाध्यक्ष

कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस

शाहूवाडीच्या तमाम मतदारांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा...

देशातील अग्रगण्य

मराठी दैनिक लोकसत्ताच्या


सकाळ ▒ कोल्हापूर शनिवार ५ मार्च २००५ कोल्हापूर शहर–जिल्ह

# सामानगड : अद्भुत वास्तुशिल्प

सुधाकर काशीद/सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : जमिनीखाली कातळात खोदलेल्या तब्बल २२ छोट्या-मोठ्या खोल्या. या खोल्यांची रचनाही वेगवेगळी. अगदी बैठकीच्या खोलीपासून शयनगृहापर्यंत आणि स्नानगृहापासून स्वयंपाकगृहापर्यंत. याबरोबरच ध्यानधारणेसाठी ओवऱ्या, होमकुंड आणि पाण्याचा हौदही. जमिनीखाली पायऱ्या उतरून गेले की हे अद्भुत वास्तुशिल्प झपकन डोळ्यांसमोर येते आणि क्षणभर जग विसरून जायला होते. हे वास्तुशिल्प गडहिंग्लज तालुक्यातल्या सामानगडावरच आहे.

गडावरच्या या २२ खोल्या म्हणजे भुयारी शिवलिंग किंवा ध्यानधारणेच एक संकुल. या गडाला खूप प्राचीन इतिहास. गडावरचे भुयारी शिवलिंग मंदिर कातळात खोदलेले आहे. या गडावरील हे भुयारी मंदिर अजूनही २२ खोल्यांत फिरून पाहण्याच्या स्थितीत आहेत. गडावर १३ ठिकाणी दगडात वीतभर खड्डे (उखळ) आहेत.

सामानगड हे पूर्वी गडहिंग्लजचे तालुक्याचे ठिकाण. या परिसराचा सारा कारभार गडावरूनच चालायचा. १८५४ मध्ये गडहिंग्लज हा पेटा झाला व कारभार गडावरून खाली आला. इंग्रजी सत्तेविरुद्धच्या उठावात सामानगडाचे महत्त्व



सामानगडावरील भुयारी मंदिराजवळच्या ओवऱ्या.

मोठे राहिले. १८४४ च्या जुलै महिन्यात पहिले बंडाचे निशाण सामानगडावर फडकले. रामजी जाधव, दौलत घोरपडे, बापूजी सुभेदार, गोविंद फडणीस, गणेश मुजुमदार, यशवंत फडणीस, मुजाप्पा कदम, जोतिबा आयरे यांच्याकडे उठावाचे नेतृत्व राहिले. सामानगडावरील बंडाचे लोण इतरत्र पसरले तर ते आवरणे कठीण होईल म्हणून तत्कालीन पोलिटिकल एजंट रिव्हज याने १९ सप्टेंबर १८४४ रोजी गडावर हल्ला करून उठाव मोडून काढण्यासाठी फौज पाठवली. मद्रासकडील फौजही त्यात होती. २४ सप्टेंबरला प्रत्यक्ष या फौजेने तोफेचा भडिमार सुरू केला. सामानगडावरच्या शूरवीरांनी हा मारा परतावून लावत १५ ते २० दिवस गड लढवला. अखेर १३ ऑक्टोबरला इंग्रजाच्या तोफ माऱ्यामुळे गड पडला. या वेळी इंग्रजांच्या फौजेचा कॅप्टन सिल्वर याचा मृत्यू झाला. या सिल्वरचे दफन या गडावरच केले व तेथे त्याच्या स्मृतिशिला बसविली. अजूनही ही स्मृतिशिला गडावर आहे; पण इंग्रजाविरुद्ध बंडाचे पहिले निशाण उभारणाऱ्या वीरांची स्मृती गडावर नाही. (क्रमशः)

### पन्हाळगडावर आज स्वच्छता


पुरातन वास्तू स्वच्छ करण्याच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून उद्या (शनिवार) 'सकाळ'चे कर्मचारी पन्हाळगडावरील काली बुरुजाच्या परिसराची स्वच्छता करणार आहेत. सकाळी आठ ते दुपारी एकपर्यंत हे काम चालू राहील. काली बुरूज पन्हाळ्यावर वीज मंडळाच्या विश्रामधामजवळ आहे.

Scanned by CamScanner

# सामानगड व प्रतापराव गुजर स्मारक

दै. तरुण भारत
४ मार्च २००२

## गडहिंग्लज तालुक्याचा ऐतिहासिक साक्षीदार



गायमुख तीर्थ

गडहिंग्लज तालुक्याला ऐतिहासिक सामानगड किल्ल्याच्या रूपाने एक भव्य दिव्य इतिहासाचा साक्षीदार लाभला आहे. सरसेनापती प्रतापराव गुजर व त्यांच्या सात साथीदारांनी आपल्या प्राणाची बाजी लावून स्फूर्ती व प्रेरणा देणारा इतिहास घडविला आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या मुखातून हा ज्वलंत इतिहास आपणास ऐकावयास मिळाला. या कार्यक्रमाचे नियोजन करताना शिक्षण क्षेत्रातील शिक्षक विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून भावी पिढीला हा इतिहास समजून देण्याचा प्रयत्न आहे.

गडहिंग्लज विभागीय कार्यालयाच्या उपजिल्हाधिकारी सौ. नंदीनी आवडे यांनी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचा पाठपुरावा करून हा कार्यक्रम मिळविला आणि तो यशस्वी करण्यासाठी गडहिंग्लज, आजरा तालुक्यातील शैक्षणिक संस्था, माध्यमिक शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक सर्व क्षेत्रातले अधिकारी, कार्यकर्ते, कर्मचारी एकत्र आणून या उपक्रमाचे नियोजन केले. कोल्हापूरला नुकतेच 'जाणता राजाचे' ८/१० प्रयोग झाले. शिवप्रेमी जनतेने या का[illegible] उदंड प्रतिसाद दिला आणि पाठोपाठ [illegible] व्याख्यानमालेचे आयोजन [illegible] त्यामुळे या सर्वांचा प्रभाव या व्याख्यान[illegible] झाल्याचे दिसून येईल.

### सामानगडचे महत्व

सामानगड येथे रामदास महाराजांचे तीन दिवस वास्तव्य होते. याच किल्ल्यावर रामदास महाराजांनी छ. शिवाजी महाराजांना दगडातून बेडकी काढून दाखविली, असे आजपर्यंत आपण ऐकत आलो आहोत. १८४५ चा सामानगडावरचा उठाव व मुंजाप्पा कदम नाईक यांचा पराक्रम अशा अनेक महत्वपूर्ण घटना, प्रसंगांनी हा इतिहास भारलेला आहे. याच परिसरात नूल, वैरगवाडी इत्यादी भागात शिंदे, शेलार इत्यादी गडकरी म्हणून वावरताना दिसतात.

याच मंडळींनी आजपर्यंत स्वाभिमानाने या सामानगडचे जतन केले आहे. आजही करतात. वैरगवाडीचे के. टी. शेलार यांनी तर या किल्ल्याला रामायण काळातील काही दाखले देऊन संशोधन वृत्तीने इथली ठिकाणे शोधली आहेत. हा किल्ला ओंकार आकाराचा असून रामखडी, सनसेट पॉईंट, गायमुखतीर्थ गुप्त उगमस्थान, तपोस्थान, भुयारी स्वरूपात रामदरबार, शिवलींग, लक्ष्मण रेषा, वनवासात असताना प्रभू रामचंद्रांचे वास्तव्याचे ठिकाण, बैठक खोली, लक्ष्मण कुटी, महासमाधी, [illegible]कुंड, प्राचीन काळातील चुली व न्हाणीघर, [illegible]र्यमंदिर, समर्थांनी स्थापन केलेले मारूती [illegible], वाघाची गुहा, भवानी मातेचे मंदिर, समर्थांनी दगडातून बेडकी काढलेले ठिकाण, सात कमानीची विहीर, चोरखिंड, पांडवमंदिर, पाच पांडवांच्या १० पादुका, महापुरुषांच्या समाध्या, अवधूत मंदिर, गोमुखातून निघालेला शाळीग्राम, पांडवांनी स्थापन केलेली ७ शिवलिंगे, ऋषी मुनींची तपश्चर्येस बसण्याची ठिकाणे शोधून काढली आहेत. याचा अर्थ सामानगड हा रामायण काळापासून प्रचिलीत असून त्याचे महत्व सर्वांना जाणवू लागले आहे. नवीन संशोधने पुढे येत आहेत. संशोधकांनी संशोधकवृत्तीने या गोष्टीकडे पहाण्याची गरज आहे. त्यादृष्टीने के. टी. शेलार यांनी शासनाकडे तसेच इतिहास संशोधक मंडळापर्यंत या घटना सादर केल्या आहेत. महाराष्ट्रातल्या ऐतिहासिक व धार्मिक विषयावर संशोधन व अभ्यास केलेल्या अनुभवी, जाणकार मंडळींनी या घटनेकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. तरच अशा दुर्लक्षित ठिकाणाकडे सर्वांचे लक्ष वेधले जाईल. दिनकरराव केशवराव शिंदे सामानगडचे



यशवंत महाराज गावडे-भोसले

गडकरी असताना सामाजिक कार्याबरोबर, सामानगडावर, महाशिवराम, मारूती उत्सव, भिमशाप्पा मठाचा उत्सव असे उपक्रम राबवून जनमानसात जागृती केली आहे. आज नूलचे शिंदे घराणे या सामानगडच्या विकासाकडे लक्ष देत असून सामानगडावर भव्य इमारत बांधली आहे. १९५७/५८ साली चौकूळचे यशवंत महाराज गावडे यांनी येथे वास्तव्य करून या ठिकाणाला महत्व आणण्याचा प्रयत्न केला. तसेच रामदासांचे एक अभ्यासक निळकंठ महाराज (रामदासी) यांनीही आपली हयात या सामानगडावर काढली असून



निळकंठ महाराज रामदासी

सामानगड परिसरातील ग्रामस्थ, कार्यकर्ते, शैक्षणिक, सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने सामानगडावर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम राबवून एक आदर्श निर्माण केला आहे.



शिवबाण/शाळीग्राम-पाण्यातील अमूल्य हिरा

आजही त्यांचे येथे वास्तव्य असून सर्वांना मार्गदर्शन करीत असतात.

### प्रतापराव गुजर स्मारक

प्रतापरावांचा तळ गडहिंग्लज परगण्याच्या आसमंतात होता. प्रतापरावांनी (फेब्रुवारी १६७४ माघ महिना) आपल्या अधिकारात बहलोलखानाला दया दाखवून धर्मवाट दिली. पण बहलोलखान उलट फिरला. ही घटना छ. शिवाजी महाराजांना समजली. महाराजांनी कडकडीत पत्र लिहून कळविले की, बहलोलखान याची गाठ घालून बुडवून फते करणे नाही तर पुन्हा आम्हास तोंड न दाखविणे. या पत्राने प्रतापराव बेभान झाले आणि आपल्या सात साथीदारांसह बहलोल खानाच्या प्रचंड फौजेवर तुटून पडले. आणि अखेर पराक्रमाची शर्थ करून हे सातही वीर कामी आले. अखेर नेसरीची खिंड रक्ताने न्हाली. दख्खनच्या दौलतीतील सात तारे तुटले. हा दिवस होता (महाशिवरात्रीचा) महाराष्ट्राची ही एक खिंड पावन झाली. आजही हे स्मारक सर्वांना प्रेरणा देते. हे इतिहासाचे साक्षीदार आहेत. त्यांच्याकडे आपण जाणीवपूर्वक लक्ष देऊन ही तीर्थक्षेत्रे समजून त्यांचे पावित्र्य राखले पाहिजे. वेडात दौडले वीर मराठे सात ही क्वी कुसुमाग्रजांची कविता आजही आपणास या प्रसंगाची साक्ष देते.

– सु. रा. देशपांडे

Scanned by CamScanner

# दारिद्र्य रेषेखालील यादी मंजुरीचे अधिकार ग्रामसभेला नाहीत

## कुमरीच्या दा. रे. यादीच्या चौकशीचे आदेश

## तालुक्याची आमसभा ८ डिसेंबरला होणार

## करंबळीत पाचवीचा वर्ग हायस्कूलला जोडणार

*गडहिंग्लज, दि. १२ (प्रतिनिधी)*
शासनाच्या आदेशाप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची यादी तयार झाली आहे. या यादीनंतर आलेल्या तक्रार अर्जाची सुनावणी सुरू आहे. सुनावणीनंतर पात्र कुटुंबाच्या यादीत समावेश करण्यात येणार आहे. येणेचवंडी, हेब्बाळ वगळता सर्व गावांच्या ग्रामसभेत यादीचे वाचन झाले आहे. दारिद्र्य रेषेखालील यादीचे वाचन फक्त ग्रामसभेत होणार आहे. यादीला मंजुरी देण्याचे अधिकार ग्रामसभेला नाहीत, अशी स्पष्ट माहिती पंचायत समितीच्या मासिक बैठकीत देण्यात आली. अध्यक्षस्थानी सभापती मारुती गुरव होते.

पंचायत समिती सभागृहात आज दुपारी एक वाजता सभेला सुरुवात झाली. प्रारंभी ग्रामीण कथाकार शंकर खंडू पाटील, जितेंद्र अभिषेकी, स्वातंत्र्य सैनिक सदानंद मजली, सौ. सुनिता देसाई, सौ. अनुराधा पाटील यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करणारा ठराव करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

तारेवाडी, कानडेवाडी, कडलगे येथील पाणीपुरवठा योजनांचे काम सुरू असून, मासेवाडी, महागांव, कुंबळहाळ येथील योजना पूर्ण झाल्या आहेत. लघुनळ पाणीपुरवठा योजनेचे २७ प्रस्ताव पाठवले होते त्यापैकी ९ मंजूर झाल्याचे आप्पासाहेब पाटील यांच्या प्रश्नास उत्तर देताना सांगण्यात आले. सिमेंट पुरवठा सुरू झाल्याने सिंचन बंधाऱ्याचे काम सुरू झाल्याचे सांगण्यात आले, हिंदुराव नौकुडकर, जोतीबा भिकले यांनी यावर प्रश्न उपस्थित करून चर्चा घडवून आणली.

नाबार्डमधून तालुक्यात ७ कामे सुरू असून, त्यावर दोन ते अडीच कोटी रु. खर्च होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. ४० लिटर माणसी या प्रमाणापेक्षा कमी पाणी मिळणाऱ्या गावांसाठी प्राधान्याने पूरक नळपाणीपुरवठा योजना मंजूर करण्याचे शासनाचे विचार आहेत. यासाठी अद्यावत माहिती पाठवत असल्याचे गटविकास अधिकारी डी. आर. जमदग्नी यांनी सांगितले. तालुका कृषि खात्याचे मंडल अधिकारी शरद चौगुले यांनी आपल्या खात्याच्या विविध योजनांची माहिती दिली. तर पंचायत समितीचे कृषि अधिकारी डी. एच. पाटील यांनी आपला अहवाल सादर करून रब्बी, ज्वारी व हरभरा बियाणांची टंचाई तालुक्यात नसल्याचे सांगितले.

नेसरी विभागात विद्युत मंडळाचे रस्त्यावरील दिव्यांची ३ लाख ३९ हजार रु. तर पाणीपुरवठा योजनेची ३ लाख ७४ हजार रु. थकबाकी असल्याचे ए. टी. थोतर यांनी सांगितले. थकबाकी भरावी अन्यथा कनेक्शन तोडण्यात यावे, असे

### चलो सामानगड

गडहिंग्लज पंचायत समितीची डिसेंबर महिन्यांत होणारी मासिक बैठक इतिहास प्रसिद्ध किल्ले सामानगड येथे बोलावण्याचा निर्णय चर्चेनंतर सभापती मारुती गुरव यांनी आजच्या सभेत जाहीर केला. उपेक्षित किल्ले सामानगडावर पं. स. बैठक घेऊन औचित्य साधण्याचा प्रयत्न होत असल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. सामानगडावर जाण्यासाठी वाहतुकीची सोय आणि तेथील मांडणी याचे वेध मात्र पं. स. कर्मचाऱ्यांना आतापासूनच लागले आहेत.

आदेश आहेत. शासनाकडून अनुदानाचे पैसे येताच भरत असल्याचे गटविकास अधिकारी श्री. जमदग्नी यांनी

### गडहिंग्लज पं. स. सभा

सांगितले. शासनाच्या वीज धोरणाबाबत आप्पासाहेब पाटील यांनी प्रश्न उपस्थित करून चर्चा घडवून आणली.

प्राथमिक शाळांसाठी खोल्या बांधताना लोकप्रतिनिधींनी पं. स. सभेत ठरवलेल्या खोल्याच बांधाव्यात असे सभापती मारुती गुरव यांनी स्पष्ट सूचना दिल्या. शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेली यादी फेटाळण्यात यावे असे सुचविण्यात आले. चन्नेकुपी मार्ग आणि मुगळी, जरळी मार्ग अत्यंत नादुरुस्त झाल्याने या मार्गावरील एस. टी. गाड्या बंद करण्याचा विचार असल्याचे आगार व्यवस्थापक डी. जी. चिकोर्डे यांनी सांगितले. आजरा–काळामवाडी गाडी किणे मार्गेच धावणार आहे. तर कवळीकट्टेसाठी दोन गाड्या सुरू केल्याचे सांगितले. हलकर्णी येथून गाड्या वेळेत सोडण्यासाठी सूचना दिल्या जातील असे सौ. आशा धबाले यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगण्यात आले.

तालुक्याना १७२ घरकुले मंजूर असून, तातडीचे प्रस्ताव पाठवण्यात येणार आहेत. ८ ग्रामपंचायतींनी गटर्स आणि रस्त्याऐवजी अन्य कामे सुचवल्याचे डी. आर. नाईक यांनी सांगितले. ग्रामसेवकाची १२ आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांची १२ पदे रिक्त आहेत. तालुक्यात मुख्याध्यापकांची १० आणि अध्यापकांची १७ पदे रिक्त आहेत. तर ३ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची पदे भरण्याची गरज गट शिक्षणाधिकारी एच एस. कदम यांनी सांगितले. विषय पत्रिकेवरील बसर्गे ग्रा. पं. ऑडिट नोटना मंजुरी, शालेय पोषण आहार तांदूळ वाटप कामाचा आढावा आणि रब्बी हंगाम कामाचा आढावा घेण्यात आला.

ऐनवेळच्या विषयात करंबळी येथील हायस्कूलला पाचवीच्या वर्गाला मंजुरीचा विषय विशेष गाजला. पं. स. सदस्य हिंदुराव नौकुडकर यांनी हा विषय मांडला आणि मंजूर असल्याचे सांगितले. गट शिक्षण अधिकारी कदम यांनी हायस्कूलला पाचवीचा वर्ग दिल्यास आपल्याच शाळेवर परिणाम होणार आहेत. अनेक प्रश्न निर्माण होणार असल्याचे सांगण्यात आले. शेवटी दोन्हीं बाजू कळवण्याचे ठरवल्यावर यावर पडदा टाकण्यात आला. तालुक्यातील दोन रस्ते देखभालीसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे देण्याबाबत चर्चा करण्यात आली. कामाचा ताण पहाता लघुजलसिंचन खात्याचे उपअभियंता येथे कायमस्वरूपी नेमण्याचा ठरावही ऐनवेळच्या ठरावात करण्यात आला. येत्या ८ डिसेंबरला आमसभा घेण्याच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली. शिलाई मशिन वाटप नियमावलीस मंजुरी, नवीन कार्यालयासाठी फर्निचर खरेदीसाठी मंजुरी देण्यात आली. तलाठ्यांचा संप मिटवावा, असेही ऐनवेळच्या ठरावात सुचवण्यात आले.

कुमरी येथे करण्यात आलेल्या दारिद्र्य रेषेखालील यादीची चौकशी करावी, असे सांगून सभापती मारुती गुरव यांनी सर्व प्राथमिक शाळेतून प्रथमोपचार पेट्या बसवण्यात याव्यात.

याबाबत गटविकास अधिकारी आणि गट शिक्षण अधिकारी यांनी यात लक्ष घालावे. प्राथमिक शाळांना २ ३ वर्षापासून कंपौंड घालण्यासाठी शक्य तेथून प्रयत्न करावेत, असे सुचवून शेवटी सभापतींनी उपस्थितांचे आभार मानले.

भ वि ज आंदोलन

# सामानगड, सेनापती गुर्जर स्मारकासाठी एक कोटीची शासनाकडे मागणी

गडहिंग्लज, ता. २७ (बातमीदार) : राज्य शासनाने नेसरी परिसरातील सरसेनापती प्रतापराव गुर्जर स्मारक आणि इतिहासप्रसिद्ध किल्ले सामानगड या दोन स्थळांचा पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही स्थळांसाठी प्राथमिक टप्प्यावर आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण ही कामे पहिल्या टप्प्यात पूर्ण करण्यात आली आहेत. या कामावर सहा लाखांचा खर्च झाला आहे.

आगामी वार्षिक नियोजनात पर्यटकांना सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासनाच्या नियोजन विभागाने ४० लाख रुपये खर्चाला मंजुरी दिली आहे. नियोजित आराखड्यात २४ लाखांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. किल्ले सामानगड आणि प्रतापराव गुर्जर या दोन्ही स्थळांच्या विकासासाठी प्रत्येकी पन्नास लाख रुपयांची भरीव तरतूद करावी. केंद्र शासनाकडून राज्याला मिळणाऱ्या पर्यटन विकास कार्यक्रमाच्या निधितीतून या दोन स्थळांच्या विकासासाठी एक कोटी रुपये मंजूर करावेत, अशी मागणी राज्यमंत्री बाबा कुपेकर यांनी केली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. पर्यटनमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे पाठपुरावा सुरू आहे.

[illegible] १८.१३.११.१९९८

१३/११/९८ दै. लोकमत

# पीक नुकसानीची चर्चा न होताच पंचायत समितीची सभा गुंडाळली

गडहिंग्लज, दि. १२ (प्रतिनिधी) - अवेळी झालेल्या पावसामुळे गडहिंग्लज तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रचंड पीक नुकसानीबाबत कोणतीही चर्चा अथवा निर्णय न होता गडहिंग्लज तालुका पंचायत समितीची मासिक सभा गुंडाळल्याने नागरिकातून आश्चर्य व्यक्त होत आहे.

तालुक्यात झालेल्या अवेळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेल्या पिकांचे प्रचंड नुकसान झाल्याने ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली होती. परंतु सदस्यांच्या मागणीला बगल देऊन थेट [illegible] पीक नुकसानीचे सर्वेक्षण व नुकसानीसंदर्भात निर्णय होण्याची अपेक्षा होती. परंतु तब्बल दोन तास चालेल्या बैठकीत पीक नुकसान व सद्य परिस्थितीबाबत कोणतीही वाच्यता न होता केवळ खाते प्रमुखांच्या [illegible] आढावा घेऊन बैठक [illegible] घेण्यात आली.

## पुढील सभा सामानगडावर

गडहिंग्लजपासून जवळच असलेल्या किल्ले सामानगडावरील तीन विशिष्ट पॉईंटवरून गडाचे ओंकार स्वरूप पाहण्यास मिळते. निसर्गाचा अत्यंत दुर्मिळ असा हा मनोहारी अविष्कार सर्वांनी पाहवा, अशी विनंती सभेच्या [illegible] अधिकाऱ्यांने केली. त्यावर सभापती मारुतीराव गुरव यांनी पंचायत समितीची पुढील सभा किल्ले सामानगडावर होईल, [illegible] सदस्यांनी होकार दर्शविला.

वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी तालुक्यातील काही ग्रामपंचायतींकडून लाखाच्या घरात वीजबिल थकबाकी [illegible] भरण्यात [illegible] शासन [illegible] वीज पुरवठा [illegible] अधिकारी [illegible] तोडू नये [illegible] तलाठ्यांच्या [illegible] होत आहे. याबाबत [illegible] तलाठ्यांच्या [illegible] व शेतकऱ्यांची [illegible] सदस्यांनी केली. [illegible] प्राथमिक [illegible] अशी सूचना [illegible]

[illegible] आदींनी चर्चेत सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी सभापती मारुतीराव गुरव होते.

# पर्यटन केंद्र व्हावे, रोपवनांची दुर्दशा थांबविण्याची मागणी

(सुनील देसाई यांजकडून)

गडहिंग्लज तालुक्यातील किल्ले सामानगड परिसराचा विकास करून तेथे पर्यटन केंद्र करण्यात यावे, पूरक पाणीपुरवठा योजनेतून कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी आणि सामाजिक वनीकरण विभागातर्फे लागवडीखाली आणलेल्या 'रोपवना'ची दुर्दशा थांबवावी. हे क्षेत्र संरक्षित करावे, अशी मागणी लोकप्रतिनिधी, निसर्गप्रेमी यांच्याकडून होत आहे.

किल्ले सामानगडाचा परिसर हा अतिप्राचीन, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. प्रभू रामचंद्र, महर्षी अगस्ती, पराशर मुनी, छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास स्वामी यांच्या वास्तव्याने पुनित झालेले ठिकाण म्हणून परिचित आहे. परंतु १४ व्या शतकांपूर्वी भोजराजाने बांधलेल्या या कडेकोट तटबंदीच्या किल्ल्याची मात्र सध्या दुरवस्था झाली आहे. या परिसराचा विकास होणे गरजेचे आहे.

पाच वर्षांपूर्वी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी सामानगड परिसराचे सर्वेक्षण टाटा इन्स्टिट्यूटकडून करून घेतले. विकासाला दिशा मिळाली. सामाजिक वनीकरण विभागातर्फे गडावर तटाच्या आतील बाजूस साधारणतः १० हेक्टर क्षेत्रात जवळपास एक लाख रुपये खर्चून विविध प्रजातीच्या १६ हजार रोपांची लागवड करून 'सुंदर रोपवन' तयार करण्यात आले. तीन वर्षांनंतर हे रोपवन ग्रामपंचायत चिंचेवाडी यांच्याकडे देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आले.

### अतिप्राचीन संस्कृती : संशोधन व्हावे

सामानगडावर अतिप्राचीन संस्कृतीच्या विशिष्ट खुणा (डिमार्केशन) आढळल्या आहेत. ॐकार स्वरूपातील सामानगडावर सापडलेल्या विशिष्ट खुणांचे पुरातत्त्व खात्यामार्फत संशोधन व्हावे, अशी मागणी सुभाष पावले यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे.

परंतु या परिसरातील ग्रामस्थांनी जनावरे, शेळया-मेंढया रोपवनात चरण्यास सोडल्यामुळे त्याची दुर्दशा झाली आहे.

आज हा परिसर हिरव्यागार वनराईमुळे सर्वांनाच आकर्षित करून घेत आहे. शाळा, महाविद्यालयांच्या सहली तसेच इतिहासप्रेमी आवर्जून सामानगडला भेट देतात. पर्यटकांना आकर्षित करणारी अनेक सौंदर्यस्थळे या ठिकाणी आहेत, परंतु लागवडीखाली आणलेल्या रोपवनातील वृक्षांची अवैध तोड सुरू आहे. त्याला पायबंद घालावा आणि किल्ले सामानगड परिसरातील बहरलेली वनराई संरक्षित करावी, अशी मागणी होत आहे.

सामानगडाचा विकास आराखडा राबविण्यासाठी ५० लाखांचा निधी आवश्यक असल्याचे मत आमदार बाबासाहेब कुपेकर यांनी शासकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना व्यक्त केले. त्याचबरोबर या परिसराला पाण्याचे दुर्भिक्ष्य भेडसावत असल्याकारणाने प्राधान्याने चिंचवाडी पाणीपुरवठा योजनेतून गडाला पूरक पाणी योजना राबविण्यात यावी व पाण्याचा प्रश्न सोडवावा याकडे ग्रामस्थांनी लक्ष वेधले आहे. गडावरील पाण्याचा प्रश्न सुटणे गरजेचे असून त्यादृष्टीने कार्यवाही सुरू असल्याचे समजते.

Scanned by CamScanner

# पर्यटन केंद्र व्हावे, रोपवनांची दुर्दशा थांबविण्याची मागणी

दै. पुढारी २३.१२.९८

(सुनील देसाई यांजकडून)

गडहिंग्लज तालुक्यातील किल्ले सामानगड परिसराचा विकास करून तेथे पर्यटन केंद्र करण्यात यावे, पूरक पाणीपुरवठा योजनेतून कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी आणि सामाजिक वनीकरण विभागातर्फे लागवडीखाली आणलेल्या 'रोपवना'ची दुर्दशा थांबवावी. हे क्षेत्र संरक्षित करावे, अशी मागणी लोकप्रतिनिधी, निसर्गप्रेमी यांच्याकडून होत आहे.

किल्ले सामानगडाचा परिसर हा अतिप्राचीन, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. प्रभू रामचंद्र, महर्षी अगस्ती, पराशर मुनी, छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास स्वामी यांच्या वास्तव्याने पुनित झालेले ठिकाण म्हणून परिचित आहे. परंतु १४ व्या शतकापूर्वी भोजराजाने बांधलेल्या या कडेकोट तटबंदीच्या किल्ल्याची मात्र सध्या दुरवस्था झाली आहे. या परिसराचा विकास होणे गरजेचे आहे.

पाच वर्षांपूर्वी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी सामानगड परिसराचे सर्व्हेक्षण टाटा इन्स्टिट्यूटकडून करून घेतले. विकासाला दिशा मिळाली. सामाजिक वनीकरण विभागातर्फे गडावर तटाच्या आतील बाजूस साधारणतः १० हेक्टर क्षेत्रात जवळपास एक लाख रुपये खर्चून विविध प्रजातीच्या १६ हजार रोपांची लागवड करून 'सुंदर रोपवन' तयार करण्यात आले. तीन वर्षांनंतर हे रोपवन ग्रामपंचायत चिंचेवाडी यांच्याकडे देखभालीसाठी हस्तांतरित करण्यात आले. परंतु या परिसरातील ग्रामस्थांनी जनावरे, शेळ्या-मेंढ्या रोपवनात चरण्यास सोडल्यामुळे त्याची दुर्दशा झाली आहे.

आज हा परिसर हिरव्यागार वनराईमुळे सर्वांनाच आकर्षित करून घेत आहे. शाळा, महाविद्यालयांच्या सहली तसेच इतिहासप्रेमी आवर्जून सामानगडला भेट देतात. पर्यटकांना आकर्षित करणारी अनेक सौंदर्यस्थळे या ठिकाणी आहेत, परंतु लागवडीखाली आणलेल्या रोपवनातील वृक्षांची अवैध तोड सुरू आहे. त्याला पायबंद घालावा आणि किल्ले सामानगड परिसरातील बहरलेली वनराई संरक्षित करावी, अशी मागणी होत आहे.

सामानगडाचा विकास आराखडा राबविण्यासाठी ५० लाखांचा निधी आवश्यक असल्याचे मत आमदार बाबासाहेब कुपेकर यांनी शासकीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना व्यक्त केले. त्याचबरोबर या परिसराला पाण्याचे दुर्भिक्ष्य भेडसावत असल्याकारणाने प्राधान्याने चिंचवाडी पाणीपुरवठा योजनेतून गडाला पूरक पाणी योजना राबविण्यात यावी व पाण्याचा प्रश्न सोडवावा याकडे ग्रामस्थांनी लक्ष वेधले आहे. गडावरील पाण्याचा प्रश्न सुटणे गरजेचे असून त्यादृष्टीने कार्यवाही सुरू असल्याचे समजते.

**अतिप्राचीन संस्कृती : संशोधन व्हावे**

सामानगडावर अतिप्राचीन संस्कृतीच्या विशिष्ट खुणा (डिमार्केशन) आढळल्या आहेत. ॐकार स्वरूपातील सामानगडावर सापडलेल्या विशिष्ट खुणांचे पुरातत्व खात्यामार्फत संशोधन व्हावे, अशी मागणी सुभाष पावले यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे.

---

# कलियुगाची विचित्र लीला, बेडूक गिळतो सापाला!

मुख्य फोटो पुढारी ५ जानेवारी ९९

५ जानेवारी १९९९

सांगली, दि. ४ (प्रतिनिधी) : निसर्गाचे जे काही नियम आहेत, ते ठरलेले आहेत. युगानयुगे या निसर्ग नियमांमध्ये अगदी अपवादात्मक वेळीसुद्धा बदल झालेला नाही. पण एखाद्या वेळेस निसर्ग नियमाला झुगारून देऊन अशी काही घटना घडते की आपणाला आश्चर्याने तोंडात बोट घालण्याची वेळ येते.

जगाच्या पाठीवर कुठेही आपण गेलो तरी साप हे आढळतातच आणि जगातल्या सगळ्या सापांचे मुख्य अन्न बेडूक हेच आहे. त्यामुळे सापाने बेडूक खाणे हा निसर्गाचा नियमच आहे. अगदी तुम्ही-आम्हीसुद्धा अनेकवेळा साप बेडकाला गिळताना पाहिला असेल. पण या निसर्ग नियमाला झुगारून देऊन एखाद्या बेडकाने जर सापालाच गिळून टाकले तर! ही अशक्य गोष्ट प्रत्यक्षात घडली आहे.

दक्षिणकन्नड जिल्ह्यातील मुडबिद्री येथे हा अद्भुत प्रकार घडला. तेथील एक छायाचित्रकार हेमंत शानबाग यांच्या घरात अनेक लोकांच्या साक्षीने हे महद्आश्चर्य घडले. त्याचे असे झाले. दुपारी जेवण झाल्यावर हात धुण्यासाठी म्हणून हे छायाचित्रकार त्यांच्या न्हाणीघरात गेले तर तिथे त्यांना एका सापाची आणि एका बेडकाची झुंज लागलेली दिसली बघणाऱ्यांना वाटले की प्रथेप्रमाणे आता साप या बेडकाला गिळून टाकणार. पण कसलं काय, हा हा म्हणता त्या बेडकाने आपला जबडा उघडला आणि त्या 'बिचाऱ्या' सापाचे तोंड पकडून सापाला तोंडाकडून गिळण्यास सुरवात केली. निम्म्याहून अधिक साप बेडकाने गिळला आणि त्याच्या पोटाची क्षमता संपल्यावर तो निपचिप पडून राहिला. सापाची वळवळ मात्र चालूच राहिली होती.

निसर्ग नियमाच्या विरोधात जाऊन काहीतरी अचाट करून दाखवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आपल्याच हाताने आपला शेवट ओढवून घेण्याचा प्रकार! शेवटी त्या बेडकाचे आणि सापाचेही तसेच झाले. बेडकाने सापाला गिळण्याचे धाडस तर दाखवले पण तासाभराच्या या झुंजीनंतर बेडूक आणि साप या दोघांनाही आपला जीव गमवावा लागला.



सापाला तोंडात पकडून गिळून टाकत असताना बेडूक!! छाया : हेमंत शानबाग

बेडकाचे मुख्य अन्न म्हणजे कीटक! हालचाल करणाऱ्या कीटकांना गट्ट करणे हा प्रामुख्याने बेडकाचा निसर्गधर्म! तथापि दीर्घकाळ उपाशी असलेला बेडूक दुसऱ्या बेडकालाही मटकावतो व तशी उदाहरणे आहेत. एखादा दीर्घकाळ उपाशी असलेला मोठा बेडूक सापाला खाऊ शकेल. पण अगदी क्वचितच अशी घटना घडू शकेल, अशी प्रतिक्रिया या घटनेबाबत विचारता शिवाजी विद्यापीठाचे प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. ए. सावंत यांनी व्यक्त केली.

Scanned by CamScanner

# गडहिंग्लज : एक आगळ्या अस्तित्वाच

घडविण्यात विविध शहरांनी कुशल कारागिराची भूमिका बजावली आहे. अशाच कुशल कारागिरांपैकी एक म्हणजे गडहिंग्लज. कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिमेकडील या 'पट्ट्या'ने जिल्ह्याच्या विकासाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलला आहे.

दूरच दूर पसरलेली हिरवीकंच वनश्री, त्यामधूनच लयबद्ध वळणे घेत वाहणारी हिरण्यकेशी, सुपीक, काळी व कसदार जमीन, त्यात घामाचे मोती गाळून सोने पिकविणारा बळीराजा, मनाला भुरळ घालणारा निसर्ग, निधड्या छातीच्या वीरांची स्मृती जोपासणारी स्थळे, ऐतिहासिक परंपरेची साक्ष देणारे गड आणि थिल्या जनजीवनावर सतत कृपाछत्राची सावली देणारे ग्रामदैवत श्री काळभैरव. अशा या सुरेख संगमातून इथे जन्म घेतलाय गडहिंग्लज या नगरीने. विविधता, परंपरा व सस्कृती याचा समृद्ध वारसा या नगरीला लाभला आहे आणि नवे पर्व, बदल व परिवर्तनाचा अंगिकार करतानाही या नगरीने हा समृद्ध वारसा आजही कायम जोपासला आहे. म्हणूनच जिल्ह्याच्या पश्चिमेकडील या 'पट्ट्या'कडे एका आदराच्या भावनेतून पाहिले जाते.

विधात्याने मुक्तहस्ताने बहाल केलेले नैसर्गिक वरदान हे या पश्चिम पटट्याच्या जरीच्या मुकुटातील 'हिरा'च आहे. येथून जवळच असणारा किल्ले सामानगड म्हणजे इथल्या निसर्गाचं अभिव्यक्त रूपडं नजरेसमोर आणणारा दूतच आहे. अलीकडेच या गडाला ओकार स्वरूपाचे रूप असल्याचे निदर्शनास आले असून त्यामुळे गडाचे महत्व आणखी वाढले आहे. गडावरील विशिष्ट पॉईंटवरून निरीक्षण केल्यास गडाचे ओंकारस्वरूप दर्शनाचे विलोभनीय दृष्य पाहण्यस मिळते. जिल्हा परिषदेच्या बांधकाम खात्यातील अधिकारी ए. टी. शेलार यांनी अध्यात्म सिद्धांताचा अवलंब करून गडाच्या या ओकारस्वरूप दर्शनाचा शोध घेतला आहे. या गडाच्या एका पॉईटवरून तर

शहाच्या प्रत्येक घटनांचा तो साक्षीदार आहे. बहलोलखानाच्या प्रचंड मूठभर सैनिकांनिशी प्रतापराव गुजर यांनी लढा दिला तो याच भूमीत.

इथली जनता श्रद्धाळू व भाविक आहे. त्यामुळे नगरीला एक धार्मिक अधिष्ठान आहे. त्यात सर्वधर्मसमभावाचा सुरेस संगम आहे. नगरीच्या उत्तरेला डोंगरकपारीत हिरव्यागार वनराईची शाल पांघरून वसलेले श्री काळभैरीचे देवस्थान म्हणजे इथल्या जनतेचे श्रद्धास्थान. 'भैरीच्या नावानं चांगभलं'चा जयघोष

चंद्राम्मा यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेला बिल्वांश्रम, गणेश मंदिर, साई मंदिर, गजानन महाराज मंदिर यामुळे येथील धार्मिक जीवन अधिक समृद्ध बनले आहे.

इथल्या बाजारपेठेचा मोठा दबदबा आहे. साऱ्या महाराष्ट्रात व उत्तर कर्नाटकात तसेच लागूनच असलेल्या गोवा राज्यातही इथल्या प्रामाणिक बाजारपेठेचा सर्वदूर परिचित लौकिक आहे. मिरची, शेंगा, गूळ यासाठी प्रसिद्ध असलेल्या या बाजारपेठेत दररोज लाखो रुपयांची उलाढाल होते.

भागावर भरभरून वर्षाव केला आहे. कष्टकरी शेतकरी, शेतमजूरांच्या जीवनात या सहकारी संस्थांच्या माध्यमातून समृद्धीने आर्थिक क्रांती घडून आली आहे.

वैद्यकिय केंद्र म्हणूनही गडहिंग्लजकडे पाहिले जाते. येथील गुणकारी व प्रामाणिक वैद्यकीय उपचारांची ख्याती सर्वदूर आहे. एक अग्रेसर शैक्षणिक केंद्र म्हणूनही या शहराने नावलौकिक मिळविला आहे.

उद्योग व्यवसायातही 'हम भी कुछ कम नही' याची प्रचिती या शहराने

# पेशवेकालीन गणेश दैवत - इ



इंचनाळ येथील पेशवेकालीन गजाननाचे मंदिर

ॐकार हेच गणेशाचे आध्यात्मिक रूप आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश यांनी त्रैलोक्यात वर्णिलेल्या चारी वेदात उल्लेखिलेले आदी-अनादी तत्व असे जो केवळ चैतन्यरूप म्हणजे गणेशभक्तांचे रक्षण करणारा, यश देणारा, विघ्नांचे हरण करणारा, समस्तांचे कल्याण करणारा असा देवाधिदेव श्री गणेश अद्भूत रुताने भक्तांच्या अंतःकरणात व्यापून राहिलेला आहे.

अशा सर्वरूपी श्री गणेशाचे पेशवेकालीन स्वयंभू रूप कोल्हापूर जिल्ह्यात गडहिंग्लज तालुक्यापासून पश्चिमेस सात किलोमीटर अंतरावर असलेल्या मौजे इंचनाळ या छोट्याशा गावी आहे. जेमतेम चार हजार लोकवस्तीच्या गावाला हिरण्यकेशी नदीने जणू आपल्या कुशीतच घेतले आहे. तालुक्याच्या ठिकाणापासून अंगारकी संकष्टी व इतर संकष्टीनिमित्त गडहिंग्लज आगारातून खास एस.टी.ची सोय करण्यात आली आहे. अर्ध्या-एक तासाच्या अंतराने गाडी भाविकांना घेऊन ये-जा करीत असते.

## रचना व पूर्वेतिहास

श्री गणेश हे ग्रामदैवत असून नो नवसास पावतो. मंदिराचा गाभारा दहा बाय दहा असा आहे. मंदिराची रचना पेशवेकालीन असून मंडपाचा जिर्णोद्धा गोपाळ कुलकर्णी यांनी`ला, असे समजते. हे मंदिर फार पुरातन असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. अशा मंदिराचा जिर्णोद्धार १९०७-०८ मध्ये केला होता.

गणेश हे नुसते ग्रामदैवत नसून गणेश पंचायतदेखील आहे. गणेश मूर्तीवर सूर्याची किरणे सूर्योदय होताच

Scanned by CamScanner

# सामानगडावर सोयी-सुविधा करा

गडहिंग्लज शहरापासून अंदाजे बारा किलोमीटर अंतरावर शिवकालीन सामानगड आहे. महाराष्ट्र शासनाच्या व पुरातत्व खात्याच्या नजरेतून दुर्लक्षित असा हा पश्चिम महाराष्ट्रातील अगदी टोकाचा किल्ला आहे. किल्ल्याच्या आजूबाजूला अतिशय गर्द हिरवीगार झाडी आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी अतिशय वेडीवाकडी वळणे असलेला रस्ता आहे. महाबळेश्वरची आठवण यावी असे या छोट्याशा घाटात वाटते. किल्ल्यावर गेल्यावर आजूबाजूच्या निसर्गसौंदर्याचे विहंगम दृश्य दिसते. आजपर्यंत या किल्ल्यावर अंधारी विहीर, भुईबोगदा, हनुमान मंदिर आहे, एवढीच माहिती होती. पण २८ डिसेंबर ९८ ला श्री. के. टी. शेलार (रा. डॉक्टर कॉलनी, गडहिंग्लज) यांनी किल्ले सामानगडावर धार्मिक पूजा, महाभिषेक, मूर्ती प्रतिष्ठापना कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमासाठी आजूबाजूच्या ४०-५० गावांतून विविध स्तरातील लोक आले होते. या सर्व लोकांना आजपर्यंत दुर्लक्षित झालेल्या ठिकाणांचे दर्शन घडविले. उदाहरणार्थ- शिवकालीन महादेव मंदिर, राजांचे स्नानगृह, स्वयंपाकघर, राजमहाल, ॐ पिंडी, शिवाजी महाराजांनी वाघिणीचे दूध काढले ते ठिकाण, भटारखाना, सूर्यमंदिर वगैरे. या सर्व गोष्टींना धार्मिक रंग न देता विज्ञानाच्या आधारावर सिद्ध करण्यास श्री. के. टी. शेलार तयार आहेत. श्री. शेलार बांधकाम अभियंता असून महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम खात्यात नोकरी करीत आहेत. महाराष्ट्र राज्य शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी किल्ले सामानगड पर्यटन स्थळ म्हणून घोषित करावे व त्यासंबंधित सोयी-सुविधा कराव्यात.

डॉ. रमेश रेडेकर, महागाव
(ता. गडहिंग्लज).

# सामानगडाच्या विकासाची बैठकीत व्यापक चर्चा

तरुण भारत - १० नोव्हेंबर ९८

*गडहिंग्लज, दि. ९ (प्रतिनिधी)*

तालुक्यातील इतिहासकालीन सामानगड किल्ल्याच्या विकासाची व्यापक चर्चा शुक्रवारी तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत करण्यात आली. आम. बाबासाहेब कुपेकर बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

सामानगडाच्या विकासासाठी ५० लाख रुपये जमविण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या निधीतून गडावरील प्रेक्षणीय स्थळे, मंदिरे यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. शिवाय सामानगडावर पाण्याची सोय, सभा मंडप बांधण्याचे ठरवण्यात आले है. सध्या सामानगडाच्या परिसरात लावलेल्या वृक्षांची तोड होत आहे. ही तोड थांबवण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायत, वन विभागाचे कर्मचारी यांनी दक्षता घ्यावी, असे सांगण्यात आले. प्रांत संजय चव्हाण यांच्यासह जि. प. उपाध्यक्ष रामाप्पा करिगार, कारखान्याचे व्हाईस चेअरमन विलासराव बागी, बाजार समितीचे सभापती शिवाजी खोत, अशोक मोहिते, चिंचेवाडीच्या सरपंच यलूबाई लोहार, गोविंद कदम, उदय कदम, अशोक कोणकी, बाबूराव कासार, विलास कोरे यांनी विविध सूचना मांडल्या. या पुढील बैठक सामानगडावर घेऊन विकास आराखडा करण्याचे शेवटी ठरवण्यात आले.

# भडगावच्या विद्यार्थ्यांचे किल्ले सामानगडावर श्रमदान

सकाळ २८ नोव्हेंबर ९८

## शिबिरात छात्रांना मार्गदर्शन

गडहिंग्लज, ता. २६ (बातमीदार) : भडगाव येथील कल्लेश्वर हायस्कूलमधील महाराष्ट्र छात्रसेनेच्या दीडशे छात्रांनी दोन दिवसांच्या शिबिरात किल्ले सामानगडावरील मारुती मंदिर आणि परिसरातील साफसफाई मोहीम राबविली. शिबिराचे उद्‌घाटन सरपंच भीमराव पट्टणशेट्टी यांच्या हस्ते झाले.

या शिबिरात श्रमदानाचे कार्य, रात्री पहारा देणे, शत्रूस ओळखण्याचे प्रशिक्षण, शत्रू पक्षावर हल्ला करणे याबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले. सामूहिक कवायत, उद्बोधक व्याख्यान, गडावरील महत्त्वाच्या ठिकाणची माहिती, सामूहिक भोजन, मनोरंजन असा भरगच्च कार्यक्रम पार पडला. सामानगड परिसराची माहिती के.टी.शेलार यांनी दिली. महाराष्ट्र छात्रसेनेचे समादेशक पोवार यांनी संचालन व इतर प्रशिक्षण दिले.

गडहिंग्लज शिक्षण मंडळाचे उपसभापती उदय कदम यांनी भोजनाची व्यवस्था केली. महागाव प्रशालेचे मुख्याध्यापक एस.बी.घुगरे, नगरसेवक निंगाप्पा भमानगोळ, चिंचेवाडीचे ग्रामस्थ यांनी शिबिरस्थळी भेट देऊन मुलांचे कौतुक केले. एमसीसी शिक्षक सुरेश मगदूम, एम.टी.कांबळे, मुख्याध्यापक के.बी.सुगते यांनी शिबिर यशस्वी केले.

Scanned by CamScanner

दै. तरुण भारत

दि. १० जुलै २००३

# सामानगडाला पर्यटन अधिकाऱ्यांची भेट

गडहिंग्लज / प्रतिनिधी ■

किल्ले सामानगडला पर्यटन स्थळ म्हणून महाराष्ट्र सरकारने मान्यता दिली आहे. सहकार राज्यमंत्री बाबासाहेब कुपेकर यांच्या सूचनेप्रमाणे पर्यटन महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक हेमंत फडके आणि पुणे येथील व्यवस्थापक अमोल भारती यांनी नुकतीच सामानगडला भेट देऊन पहाणी केली. सामानगडला पर्यटन स्थळ उभारताना नेमके काय करावे लागेल याची त्यांनी चर्चा केली. यावेळी चिंचेवाडीचे सरपंच अर्जुन सुतार, के. टी. शेलार उपस्थित होते. पहिल्या टप्प्यात कोल्हापूर, निपाणी, संकेश्वर येथे सामानगडचे अंतर दर्शविणारे फलक उभारणार असल्याचे सांगण्यात आले. या किल्ल्याच्या विकासासाठी ५० लाखाची मागणी ना. कुपेकर यांनी केली आहे. पहाणी करून आराखडा निश्चित झाल्यावर येथील कामाला सुरवात होणार असल्याचे सांगण्यात आले.

Scanned by CamScanner

आफोळे यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रा. श्रीपाल जर्दे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची कल्पना मांडली. कृतज्ञता या अंकाचे प्रकाशन पी. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. बाहुबली ब्रह्मचर्याश्रम आणि बाहुबली विद्यापीठ या मातृसंस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच समाज व राष्ट्राच्या

धन्यकुमार चौगुले, धन्यकुमार शेटी, डॉ. भोजराज शिखरे यांनी केले. डॉ. रावसाहेब पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर शेवटी या कृतज्ञता समारोह समितीचे कार्यवाह बालराज महाजन यांनी आभार मानले व माजी विद्यार्थ्यांची पुढील बैठक १६ जानेवारीला होईल असे जाहीर केले.

मजरेवाडी, धाद (ता. राधानगरी), थिथवाड (ता. ...), ... भजनप्रेमी उत्सव समिती, शिरोळ आदी ठिकाणच्या दत्त मंदिरात दत्त जयंतीनिमित्त प्रवचन, कीर्तन, भजन, जागर, पारायण व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २३ डिसेंबरअखेर चालणाऱ्या या जयंती उत्सवांतर्गत काही ठिकाणी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे फुलेवाडी येथील बालगणेश तरुण मंडळातर्फे दि. २२ रोजी रांगोळी व गुरूदेव दत्त पालखी मार्गावरील सजावट या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तर जाधववाडी येथील दत्त भक्त मंडळातर्फे दि. २२ रोजी रांगोळी स्पर्धा, दि. २३ रोजी महिला व पुरुष गटाच्या संगीत खुर्ची स्पर्धा व दि. २४ रोजी रेकॉर्ड डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

# स्त्रीमुक्तीची चळवळ एकाकीपणे राबवून यशस्वी होणार नाही - डॉ. साळुंखे

## ७ व्या विचारवेध संमेलनाची यशस्वी सांगता

भाई दाजीबा देसाईनगर, बेळगाव, दि. १९ (वार्ताहर): स्त्री-मुक्ती चळवळ एकाकीपणे राबवून यशस्वी होणार नाही. ही चळवळ दलित, गरीब यांच्या शोषक विरोधी चळवळीशी जोडली गेली पाहिजे तरच चळवळीला चांगला आकार येईल, असे विचार ७ व्या विचारवेध संमेलनाचे अध्यक्ष डॉ. आ. ह. साळुंखे यांनी संमेलनाच्या समारोपप्रसंगी व्यक्त केले.

तीन दिवस चाललेल्या विचारवेध संमेलनाचा आढावा घेऊन संमेलनात जुनी, मधली आणि तरुण पिढीचा संगम होऊन परिवर्तन चळवळीला नव्या पिढीकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. न्यायाची आणि माणुसकीची समाज व्यवस्था निर्माण करणे हा परिवर्तनाच्या चळवळीचा गाभा असल्याचे स्पष्ट करून ते पुढे म्हणाले, शोषित, पीडित वर्गातही खूप गुणवत्ता आहे. त्यांना संधी मिळाली पाहिजे. त्यांची सुप्त शक्ती जागी करून ती विकसित करण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. भावीकाळात परिवर्तनवादी चळवळीला अवघड लढाई लढावी लागणार असून बहुसंख्य दुर्लक्षित समाजाला विकसित वर्गाबरोबर नेण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागणार आहेत.

प्रारंभी डॉ. आंबेडकर अकादमीचे कार्याध्यक्ष किशोर बेडकीहाळ यांनी आपल्या प्रास्ताविकात तरुण अभ्यासकांच्या सहभागातून संमेलनाला स्फूर्ती मिळाल्याचे स्पष्ट करून बेळगावच्या संमेलनात महिला वर्गाने दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल गौरवोद्गार काढले. बेळगावच्या संयोजन समितीने संमेलनाची चोख व्यवस्था आणि तत्पर सेवा उपलब्ध केल्याबद्दल त्यांनी धन्यवाद दिले. पुढील वर्षी सावंतवाडी येथे ८ वे विचारवेध संमेलन भरणार असल्याचे त्यांनी घोषित केले. शेवटी माजी प्राचार्य व्ही. ए. पाटील यांनी संमेलनाला उपस्थित प्रतिनिधी, श्रोते, संमेलनात सहभागी झालेले अभ्यासू व्याख्याते, तसेच सर्व सहाय्यभूत संस्था, व्यक्तींचे यथोचित शब्दांत आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आनंद मेणसे यांनी केले.

स्त्रियांच्या आणि दलितांच्या गुलामगिरीला मनु संस्कृती जबाबदार असून अजून स्त्री खऱ्या अर्थाने मुक्त नाही, अशी खंत दिल्ली येथील इतिहासाच्या प्राध्यापिका आणि पंडिता रमाबाई यांच्यावरील इंग्रजी चरित्रग्रंथाच्या लेखिका डॉ. उमा चक्रवर्ती यांनी व्यक्त केली. येथील भाई दाजीबा देसाईनगर येथे आयोजित ७ व्या विचारवेध संमेलनाच्या शेवटच्या सत्रात 'इतिहासाचे पुनर्लेखन आणि स्त्रिया' या विषयावर त्या बोलत होत्या.


## भावपूर्ण श्रद्धांजली



**कै. सुमनलाल मणीलाल शाह**

आमचे स्नेही श्री. सुमनलाल मणीलाल शाह यांचे दु:खद निधनाने त्यांच्या कुटुंबियावर कोसळलेल्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिर:शांति देवो, हीच प्रार्थना.

▶ नगराज, बाबुलाल, विमलचंद केवलचंद, पारसमल, ललीत आदि समस्त मेहता परिवार

▶ मेहता टायर्स, पूना-कोल्हापूर

## उठमणू




# किल्ले सामानगड पर्यटन क्षेत्र घोषित करण्याची मागणी

गडहिंग्लज, दि. १९ : ऐतिहासिक किल्ले सामानगड हा पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित व्हावा, अशी मागणी येथील नलवडे डेअरीचे चेअरमन व कार्यकारी संचालक संग्रामसिंह आप्पासाहेब नलवडे यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली असून त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांचे अवर सचिव यांनी पत्राद्वारे नलवडे यांना कळविले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, किल्ले सामानगड हा ऐतिहासिक किल्ला असून या किल्ल्यावर पुरातन शिवलिंग मंदिर, श्री अंबाबाई देवालय, सात कमानीची विहीर, मोंगलाई टेकडी, जवळच सरसेनापती प्रतापराव गुजर यांची समाधी आहे. हा ऐतिहासिक किल्ला पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करावा. या किल्लाकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. हा किल्ला शिवकालीन असून या किल्ल्याचे बांधकाम समर्थ स्वामी रामदास यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले होते, असे ऐतिहासिक पुरावे आहेत. हा किल्ला नागरिकांना इतिहासप्रेमींना मार्गदर्शक ठरणारा आहे. यासाठी किल्ले सामानगड पर्यटन क्षेत्र घोषित व्हावा असेही शेवटी म्हटले आहे.

## मोटारसायकल घसरून दोघे जखमी

कोल्हापूर, दि. १९ : मोटारसायकल घसरून आज रात्री राक्षी फाट्यानजीक झालेल्या अपघातात सुनील तुकाराम भोईटे (वय ३०, रा. ४०९ ए शिवाजी पेठ) आणि विलास बाळकृष्ण

## चारित्र्याच्या संशयावरून पत्नीवर वार करून पतीची आत्महत्या

सोलापूर, दि. १९ (वार्ताहर) : आपली पत्नी ही माहेरामध्ये असल्याच्या संशय घेऊन

## सौंदत्ती यात्रेसाठी हजारो भाविक रवाना

कोल्हापूर, दि. १९ : सौंदत्ती येथील श्री रेणुका देवी यात्रेसाठी (यलम्मा डोंगर) कोल्हापुरातून आज ११० एस. टी. बसेस रवाना झाल्या. तसेच खासगी वाहनातूनही हजारो भाविक रवाना झाले आहेत.

मंगळवार दि. २१ डिसेंबर रोजी मार्गशीर्ष पौर्णिमा हा यात्रेचा मुख्य दिवस आहे. काल रात्रीपासून खास यात्रेसाठीच्या एस. टी. बस जात असून उद्याही काही बसेस निघणार आहेत.

सामुदायिकरीत्या यात्रेस जाण्याची परंपरा असल्याने शिवाजी पेठ, मंगळवार पेठ आदी परिसरातून खास यात्रेसाठी नैमित्तिक कराराने एस. टी. बसेस घेऊन मोठ्या संख्येने भाविक यात्रेस रवाना झाले आहेत. श्री रेणुका भक्त मंडळ तसेच अन्य मंडळांनी यामध्ये पुढाकार घेतलेला आहे. राज्य परिवहन महामंडळानेही खास यात्रेसाठी बससेवा सुरू ठेवली आहे. यासाठी पाच गाड्या तैनात करण्यात आल्या

केसरी दि १९.१२.१९९९

9860310234

गाभारा

सामना मुंबई, मंगळवार, दि. ९ जून २००९

# ॐकाराचे स्वरूप

ॐ हा विश्वातील पहिला ध्वनी, पहिला स्वर, पहिला नाद, पहिला शब्द. म्हणून त्याला आदिब्रह्म म्हटले जाते. संपूर्ण विश्वाची उत्पत्ती ॐ मधून झाली आहे, असे प्राचीन ऋषिमुनींचे म्हणणे आहे. अंतर्यामातून निघत असलेला ॐकाराचा निःशब्द ध्वनी म्हणजे जीवनाच्या अंतरंगातले सूक्ष्म संगीत होय. विश्वातील सर्व स्वरांचा आणि ध्वनींचा ॐकारामध्ये समावेश झालेला आहे. ॐकारामध्ये नाही असे या विश्वात काही नाही, आणि ज्यात ॐकार नाही असे विश्वात काही नाही. ॐकार हा एकच नाद परमशुद्ध नाद आहे. ज्या परमेश्वराने अंतरिक्षात बाह्य स्वरूपातून जे चैतन्यमय स्पंदन सोडले, जो नाद प्रसृत केला, तो चैतन्यमय नाद-स्पंदन म्हणजेच ॐकार. तो ॐकार पूर्वीपासून आहे, आताही तसाच चालू आहे व सृष्टीचा अंत होईपर्यंत तो तसाच चालू राहणार आहे. त्याने सारे ब्रह्मांड व्यापलेले आहे.

ॐकाराचे ॐ हे सर्वांना माहिती असलेले प्रचलित नाव. पण त्याला आणखीही अनेक नावांनी ओळखले जाते. प्रणव, उद्‌गीथ, ब्रह्म, मूलज्योती, बिंदुशक्ती, सावित्री, आदिबीज, पंचरश्मी, वेदसार, भवनाशन, सोहम्, गायत्रीबीज, त्रिकूट, महानाद अशा अनेक नावांनी त्याचा उल्लेख वेद, उपनिषदे, गीता, ज्ञानेश्वरी इत्यादी ग्रंथात आढळतो.

ॐ हा एक शब्द आहे तसेच ते एक अक्षरही आहे. तो वेगवेगळ्या प्रकाराने लिहिण्यात येतो. ॐ, ओं, ओम् किंवा ओम असा मराठीत लिहिला जातो. त्याचा उच्चार प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने करतो. पण लिहिलेल्या चिन्हावरून म्हणजे शब्दावरून योग्य उच्चार करणे शक्य होत नाही. म्हणून ॐ चा उच्चार योग्य प्रकारे करण्यासाठी ओ ३ म् असा लिहिण्याचा प्रघात आहे. ॐ चा उच्चार योग्य होण्यासाठी ओ ही मात्रा ऱ्हस्व उच्चाराच्या मानाने तिप्पट लांबवायची आहे हे दाखविण्यासाठी ओ नंतर ३ लिहून पुढे म् लिहिण्याचा प्रघात आहे. ओ ३ म् वरून उच्चार व्यवस्थित करणे शक्य होते.

ॐमध्ये तीन अक्षरे आहेत. ( मध्ये बेरजेचे चिन्ह टाकणे) अ उ म् यातील 'अ' चा अर्थ आहे विश्व, 'उ' चा अर्थ आहे तेजस आणि 'म' चा अर्थ आहे प्राज्ञ. ॐकाराच्या अकार, उकार, मकार या तीन मात्रा आणि त्याच्या जोडीला अर्धचंद्र आणि बिंदू ही अर्धी मात्रा, अशा एकंदर साडेतीन मात्रा आहेत. या साडेतीन मात्रांचे अचूक उच्चारण होणे हे फलप्राप्तीच्या दृष्टीने आवश्यक असते, हे जरी खरे असले तरी मनुष्यप्राणी जन्माला येतो त्यावेळी अर्भकाच्या मुखातून पहिले उद्‌गार बाहेर पडतात ते म्हणजे अ, उ, म. हेच वर्ण प्रामुख्याने प्रत्येकाच्या मुखातून जन्मतः असतात. कोऽहम्, कोऽएम् म्हणत रडून मूल जन्माला येते. पण त्याच्या श्वासातून त्याला उत्तर मिळते - सोऽहम्, सोऽहम्. ही दोन्ही रूपे ॐकाराचीच आहेत. सोऽहम् शब्दाला ॐकाराएवढेच महत्त्व दिले गेलेले आहे. आई, माई, माँ, मम्मी, अम्मा इत्यादी नावाने मातेला संबोधिले जाते. या सर्व नैसर्गिक उद्‌गारांत ॐकार अप्रत्यक्ष रूपात अस्तित्वात असल्याचे दिसून येते.

माणसाला भाषेचे ज्ञान अगर वर्णमालेची माहिती होण्याअगोदर त्याच्या भावव्यक्तीसाठी जे ध्वनी उमटतात ते अ, उ, म् हेच असतात म्हणजे ॐकारानेच व्यक्त होतात. मग ती व्यक्ती कुठल्याही जातीधर्माची किंवा कुठल्याही देशातील असो. माणसाच्या आनंदाच्या उद्‌गारात, दुःखाच्या [illegible] अ, उ, म् या मूळ बीजध्वनीचे प्रकटन व आवर्तन होत असल्याचे दिसून येते. [illegible] कोणी हाक मारल्यावर ओ देण्याची किंवा बोंब मारण्याची क्रियादेखील [illegible] मध्येच मोडते. गाय हंबरते, वाघ, सिंह डरकाळ्या फोडतात हे सर्व ॐकाराचेच शब्द होत. शेळी ओरडताना शेवटी मऽऽऽ असा आवाज येतो.

■ **मनोहर नाईक**, संपर्क, ९८२०६५४५७, २८७४२१३९

Scanned by CamScanner